रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ३२२ । पृष्ठे १० । RGD/016/2026-28


www.krushival.in




# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १ मे २०२६

किंमत ४ ₹







# 392 गावांना दरडींचा धोका

## रायगडमध्ये दशकभरात 289 गावांची भर



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात विकासाच्या नावाखाली डोंगर पोखरण्याचे प्रकार वाढत असून, त्याचे गंभीर परिणाम आता समोर येत आहेत. प्रशासनाकडून याकडे पुरेसे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याने डोंगर पायथ्याशी असलेल्या गावांतील नागरिकांवर त्याचा थेट परिणाम होत आहे. यंदाच्या पावसाळ्यात तब्बल ३९२ गावांना दरडीचा धोका असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, दहा वर्षांपूर्वी ही संख्या केवळ १०३ इतकी होती. आता त्यात २८९ गावांची भर पडल्याने परिस्थिती अधिक चिंताजनक बनली आहे.

या धोकादायक गावांमध्ये महाड आणि पोलादपूर तालुक्यांचा मोठा वाटा असून, या दोन तालुक्यांतील २०० हून अधिक गावे दरडप्रवण क्षेत्रात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. रायगड हा प्रामुख्याने ग्रामीण जिल्हा असून, गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर डोंगर खोदकाम सुरू आहे. अनेक •> पान २ वर

### विकास की विनाश?

रायगडमध्ये पोलादपूरपासून पनवेलपर्यंत अनेक लहान-मोठे डोंगर परिसराच्या सौंदर्यात भर घालत होते. पावसाळा व हिवाळ्यात या डोंगर भागात फिरण्यासाठी स्थानिकांसह पर्यटकांची गर्दी होत असे. मात्र, सध्या विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर डोंगरांचे उत्खनन करून त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.काही ठिकाणी डोंगर अक्षरशः पोकळ करण्यात आले असून, त्यामुळे जमिनीची पकड सैल झाली आहे. परिणामी, पावसाळ्यात अतिवृष्टीदरम्यान माती धूप होऊन दगड, झाडे व मातीचे ढिगारे कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे 'विकास की विनाश?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### दरडप्रवण गावांमध्ये उद्घोषणा प्रणाली

रायगड जिल्ह्यातील ३९२ दरडप्रवण गावांची भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागामार्फत वर्गवारी करण्यात आली आहे. यामध्येवर्ग १ मध्ये १८ गावे, वर्ग २ ७१ मध्ये गावे, वर्ग ३ मध्ये १५९ गावे आहेत. वर्ग १ आणि २ मधील ८९ तसेच वर्ग ३ मधील ३ अशा एकूण ९१ गावांमध्ये सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली सुरू करण्यात आली आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातून एकाच वेळी या सर्व ठिकाणी हवामानाची पूर्वसूचना दिली जाणार आहे. धोका निर्माण झाल्यास सायरनद्वारे इशारा देण्यात येणार असून, ही प्रणाली गावांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची ठरणार आहे.

# पुढील १२ दिवस धोक्याचे?

- **सोशल मीडियावरील दाव्यांवर संभ्रम**
- **हवामान विभागाचा खुलासा**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सध्या दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून, उन्हाचे तीव्र चटके नागरिकांना जाणवत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून, दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे नागरिकांना टाळावेसे वाटत आहे. अशातच सोशल मीडियावर "पुढील बारा दिवस अत्यंत धोक्याचे असून, १२ मेपर्यंत तापमान ४५ ते ५५ अंश सेल्सिअसपर्यंत जाणार" असा संदेश मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. तसेच सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत घराबाहेर पडू नये, असा इशाराही या संदेशांमधून दिला जात आहे.

मात्र, या व्हायरल संदेशांबाबत अधिकृत स्तरावर स्पष्टता देताना, आठवडाभरात तापमानात कोणतीही लक्षणीय वाढ होणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाशी संपर्क साधला असता, १ ते ४ मे या कालावधीत तापमान स्थिर राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ४ मेपर्यंत रायगड जिल्ह्यासाठी 'ग्रीन अलर्ट' जारी करण्यात आला असून, कोणताही गंभीर तापमानाचा धोका नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील पर्यावरणीय बदलांबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. •> पान २ वर

# कशेडी घाटात बस-काँक्रिट मिक्सरची धडक; दहा जखमी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**



तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघात सातत्याने होत आहेत. कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहतूक सुरळीत झाली असूनही जुन्या कशेडी घाटात खचलेल्या डेंजरझोनमध्ये बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी मध्यरात्री ११ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास महामार्गावरील भोगावजवळ खेड बोरीवली एसटी बस आणि काँक्रिट मिक्सर वाहनाची टक्कर होऊन झालेल्या अपघातात बसमधील नऊ प्रवासी व काँक्रिट मिक्सर वाहनाचा चालक असे दहा जण किरकोळ जखमी झाले. जखमींना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पोलादपूर पोलीस •> पान २ वर

# भीषण अपघातात शेतकऱ्याचा मृत्यू

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेफिकीर व अतिवेगाने वाहन चालवणाऱ्या चालकामुळे झालेल्या अपघातात ६३ वर्षीय ज्येष्ठ शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मधुकर हरिभाऊ पाटील (६३, रा. मिठेखार, ता. मुरुड) हे २८ एप्रिल •> पान २ वर

## वेधक

### राज्यावर वीजटंचाईचे संकट

**नागपूर :** राज्यात वाढत्या उन्हाळ्यामुळे विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत असताना काही महत्त्वाचे वीजनिर्मिती संच बंद पडल्याने वीजपुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. परिणामी, राज्यावर संभाव्य वीजटंचाईचे संकट निर्माण होण्याची भीती आहे. काही दिवसांपूर्वी कोराडी, नाशिक आणि चंद्रपूर येथील वीजनिर्मिती संच बंद पडले होते. त्यापैकी काही संच पुन्हा सुरू करण्यात आले असले, तरी चंद्रपूर प्रकल्पातील आणखी दोन संच बंद पडल्याने परिस्थिती गंभीर झाली आहे. दरम्यान, विजेची मागणी २९,००० मेगावॅटच्या पुढे गेली असून, अचानक वाढ झाल्यास वीजपुरवठ्यावर परिणामाची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

### 'मिसिंग लिंक' १ मेपासून सुरू

**मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्प १ मेपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि वाहतूक पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात १ ते ३१ मेदरम्यान केवळ हलकी मोटार वाहने, बस आणि प्रवासी वाहनांनाच या मार्गावरून प्रवासाची परवानगी असेल. या काळात मालवाहू आणि अवजड वाहनांना पूर्णपणे प्रवेशबंदी करण्यात आली आहे. तसेच ज्वलनशील व धोकादायक वस्तू वाहून नेणाऱ्या 'हॅझमॅट' वाहनांना या बोगद्यातून प्रवासास मनाई करण्यात आली आहे.

# भाजप प्रवेशानंतरही कारवाई



**माजी नगरसेविकेच्या पतीची अनधिकृत इमारत सिडकोने पाडली**

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील रोडपाली गावात उभारण्यात आलेल्या अनधिकृत पाच मजली इमारतीवर सिडको प्रशासनाने मोठी तोडक कारवाई केली. संबंधित इमारत भाजपात प्रवेश करणाऱ्या माजी नगरसेविका प्रिया भोईर यांचे पती विजय काना भोईर यांच्या नावावर असल्याची माहिती समोर आली आहे.

सिडकोच्या अतिक्रमण विभागाचे अधिकारी श्रीकांत पावसकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही इमारत कोणतीही वैध परवानगी न घेता उभारण्यात आली होती. त्यामुळे नियमानुसार कारवाई करत पोखलनच्या सहाय्याने इमारतीचा मोठा भाग जमीनदोस्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान सिडकोचे जवळपास ४० अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच कळंबोली पोलीस •> पान २ वर

# विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या दहा जागांसाठीची निवडणूक यंदा बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. नियमित ९ जागा आणि १ पोटनिवडणूक अशा एकूण १० जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. मात्र, कोणत्याही पक्षाने अकरावा उमेदवार न दिल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १२ मे रोजी मतदान होणार होते. सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान आणि त्याच दिवशी निकाल जाहीर होणार होता. मात्र, सद्यःस्थितीत सर्व दहा उमेदवार बिनविरोध निवडून येणार असल्याचे निश्चित झाले आहे.

या निवडणुकीत काही अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. मात्र, त्यांच्याकडे •> पान २ वर

**तळोजा एमआयडीसीमधील वास्तव समोर | कामगार दिनानिमित्त वेधले लक्ष**

# लाखो कामगारांचा कष्टमय प्रवास

**दिपक घरत**

**। पनवेल ।**

१ मे म्हणजे महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन. राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा कणा असलेल्या कामगारांच्या प्रश्नांकडे या दिवशी विशेष लक्ष वेधले जाते. तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीत आजही लाखो कामगार विविध अडचणींना तोंड देत उद्योगचक्र फिरवत आहेत.

तळोजा एमआयडीसीमध्ये सुमारे ९०० ते ९५० उद्योग कार्यरत असून, येथे थेट आणि अप्रत्यक्ष मिळून अंदाजे १ ते १.२ लाख कामगार कार्यरत आहेत. काही अंदाजानुसार, ही संख्या २ ते ३ लाखांपर्यंत पोहोचते. रसायन, औषधनिर्मिती, अभियांत्रिकी आणि फूड प्रोसेसिंगसारख्या उद्योगांमध्ये हे कामगार दिवस-रात्र मेहनत घेत आहेत.

> कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी चांगले कायदे बनवण्यात आले, मात्र या कायद्यांची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना वरिष्ठांच्या परवानगीशिवाय काहीच करता येत नसल्याने कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नाही.
> – वैभव पाटील, जनरल सेक्रेटरी, न्यू मॅरिटाईम अँड जनरल कामगार संघटना

मात्र, या कामगारांची परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे. अनेक कामगार कंत्राटी पद्धतीवर काम करत असल्याने त्यांना नोकरीची शाश्वती नाही. किमान वेतन, कामाचे तास आणि सुरक्षा सुविधा याबाबतही अनेक ठिकाणी तक्रारी कायम आहेत. विशेषतः केमिकल उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना •> पान २ वर

### राहण्याच्या सुविधांचा प्रश्नही गंभीर

तळोजा परिसरात काम करणारे अनेक कामगार हे परराज्यातून आलेले असल्याने ते आजूबाजूच्या गावांतील भाड्याच्या खोलीत अत्यंत मर्यादित सुविधांमध्ये राहात आहेत. पाणी, स्वच्छता आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या असल्याने त्यांच्या जीवनमानावर परिणाम होत आहे.



# कामगार दिनानिमित्त रॅली

**पनवेल :** म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन व मुंबई लेबर युनियन यांच्या संयुक्तवतीने १ मे रोजी जागतिक कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कामगार रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून या रॅलीची सुरुवात होणार असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅली पुढे मार्गस्थ होईल. ही रॅली शहरातून मार्गक्रमण करत महानगरपालिकेसमोरील महात्मा गांधी उद्यान येथे पोहोचणार असून, तेथे महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीची सांगता करण्यात येणार आहे. कामगारांच्या हक्कांसाठी एकजूट आणि संघटित शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या रॅलीत ॲड. सुरेश ठाकूर, डॉ. भक्तराज भोईटे, संतोष पवार, अनिल जाधव, सुजित पाटील, दत्तगुरू म्हात्रे, महेंद्र गायकवाड आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसेच विविध विभागातील कामगार, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, ''कामगार एकता झिंदाबाद'', ''१ मे झिंदाबाद'', ''इंकलाब झिंदाबाद'', ''महाराष्ट्र दिन झिंदाबाद'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमणार आहे, असे सांगण्यात आले

पान १ वरून

## ३९२ गावांना दरडीचा धोका

ठिकाणी प्रशासनाची परवानगी न घेता तर काही ठिकाणी मर्यादित परवानगी घेऊन त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रमाणात माती व खडीचे उत्खनन केले जात असल्याचे दिसून येते. या अनियंत्रित खोदकामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने डोंगरांची स्थिरता धोक्यात आली आहे.

दरवर्षी प्रशासन दरडग्रस्त गावांची माहिती गोळा करून उपाययोजना करण्याचा प्रयत्न करते. मात्र, डोंगर पोखरण्यावर प्रभावी नियंत्रण नसल्याने या उपाययोजना अपुऱ्या ठरत असल्याचे चित्र आहे. रायगड जिल्ह्याने यापूर्वी अनेक भीषण दरडीच्या दुर्घटना अनुभवल्या आहेत. महाड व पोलादपूर तालुक्यातील दरडी दुर्घटनांमध्ये ३०० हून अधिक जणांचा बळी गेला होता. २०२१ मध्ये महाड तालुक्यातील तळीये येथे झालेल्या दरड दुर्घटनेत ८४ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर २०२३ मध्ये १९ ते २० जुलैच्या मध्यरात्री इरसालवाडी येथे दरड कोसळून अनेकांना जीव गमवावा लागला, तर काही जण अद्यापही बेपत्ता राहिले. अशा घटनांमुळे जिल्ह्यात दरडीच्या दुर्घटनांची भीती अधिक वाढली आहे. दरडप्रवण भागात राहणाऱ्या नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. पावसाळा जवळ येत असताना ही चिंता अधिक तीव्र झाली आहे.

प्रशासन सज्ज, उपाययोजना सुरू

पावसाळा सुरू होण्यासाठी काहीच दिवस उरले असताना जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी तयारी सुरू केली आहे. वादळी वारे आणि अतिवृष्टीमुळे होणाऱ्या संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. दरडप्रवण भागांचे सर्वेक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेवर भर दिला जात असून, आवश्यक ती पूर्वतयारी करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दरडग्रस्त गावांवर संख्येवर दृष्टीक्षेप

तालुके - गावांची संख्या
पोलादपूर - १३९, महाड - १२२, अलिबाग - ०९
कर्जत - ०५, खालापूर - १२, तळा - ०३
पनवेल -०३, पेण - १३, रोहा - २०
सुधागड - ०९, म्हसळा - १४, श्रीवर्धन - १२
मुरूड - ०९, माणगाव - २२
-------------
एकूण - ३९२

## भाजप प्रवेशानंतरही कारवाई

ठाण्याचे कर्मचारीही बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते.

कारवाईदरम्यान इमारतीची वीज जोडणी तोडण्यात आली असून, पाण्याची टाकीदेखील उद्ध्वस्त करण्यात आली. उर्वरित बांधकामही लवकरच पाडण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

राजकीय वर्तुळात आश्चर्य

निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश केलेल्या माजी नगरसेविका प्रिया भोईर यांच्या पतीच्या नावावरील इमारतीवरच सिडकोने कारवाई केल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे, प्रिया भोईर यांचे पती विजय भोईर हे भाजपचे विधान परिषद आ. विक्रांत पाटील यांचे निकटवर्तीय मानले जातात. असे असतानाही ही कारवाई झाल्याने, भाजपमधील अंतर्गत राजकारणाचा हा भाग असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर रंगू लागली आहे.

## लाखो कामगारांचा कष्टमय प्रवास

आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत असल्याचे सांगितले जाते. कामगार संघटनांच्या मते, औद्योगिक विकासासोबत कामगारांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत आहे. कामगार दिनाच्या निमित्ताने सरकार आणि औद्योगिक प्राधिकरणांनी कामगारांसाठी सुरक्षित कामाचे वातावरण, परवडणारी घरे, आरोग्य सुविधा आणि स्थिर रोजगार यावर ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, उद्योगांच्या प्रगतीमागे कामगारांचे योगदान मोठे असले तरी त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. १ मेनिमित्ताने कामगारांच्या हक्कांची आठवण करून देत त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी ठोस निर्णय घेणे हीच खरी कामगार दिनाची खरी सांगता ठरणार आहे. वाहतूक व्यवस्थेचा अभाव हादेखील मोठा मुद्दा आहे. अनेक कामगारांना रोज लांब अंतर प्रवास करून कारखान्यात पोहोचावे लागते. सार्वजनिक वाहतुकीची अपुरी साधने आणि वाढती गर्दी यामुळे त्यांचा वेळ आणि ऊर्जा दोन्ही खर्ची पडतात.

## पुढील १२ दिवस धोक्याचे?

विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल झाल्याने रस्त्यांवरील सावली कमी झाली आहे. विविध उपक्रमांतून लावण्यात आलेली झाडेही नष्ट होत असल्याचे चित्र आहे. त्यातच वणव्यांच्या घटनांमुळे जंगलांमध्ये आगी लागून पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. झाडांची घटती संख्या आणि वाढत्या आगीमुळे वातावरणात मोठे बदल होत असून, त्याचा परिणाम मानवी जीवनावरही होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तापमान ३२ ते ४२ अंश सेल्सिअसदरम्यान नोंदवले जात आहे. या पार्श्वभूमीवर तापमानात मोठी वाढ होणार असल्याचे संदेश सोशल मीडियावर फिरत असले, तरी अधिकृत यंत्रणांनी त्याबाबत सावध भूमिका घेतली आहे. प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे. तसेच मे महिन्यात उष्णतेचा प्रभाव वाढत असल्याने अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे आणि आरोग्याची काळजी घ्यावी.

## भीषण अपघातात शेतकऱ्याचा मृत्यू

रोजी रात्री आपल्या दुचाकीवरून चणेरा येथील आंब्याच्या बागेची पाहणी करून परत येत होते. त्यावेळी समोरून येणारा पवन रमेश चौधरी (रा. शिरगाव) हा दुचाकीवर तिघांना बसवून विरुद्ध बाजूने आणि वेगाने वाहन चालवत येत होता. त्याने पाटील यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात मधुकर पाटील गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पाटील यांच्या निधनामुळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

याप्रकरणी मृताचे सुपुत्र प्रथमेश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक दीपक म्हशीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई सुरू आहे. अपघातातील आरोपी चालकही जखमी असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## कशेडी घाटात बस-काँक्रिट मिक्सरची धडक; दहा जखमी

सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, खेड एसटी स्थानकातून खेड ते बोरिवली रातराणी बस (क्र.एमएच ०९ एफएल १०६७) घेऊन चालक बाळकृष्ण सुखदेव मिंड (रा. खेड) हे जुन्या मार्गावर कशेडी आंबा तसेच कशेडी बंगला थांबून प्रवासी घेत कशेडी घाटामधून मार्गस्थ होताना पोलादपूर हद्दीतील भोगावजवळ आली असता महामार्ग खचलेल्या डेंजरझोनमध्ये बसचे ब्रेकफेल झाल्याने बस विरुध्द दिशेला गेली आणि समोरील आयशर कंपनीच्या उभ्या असलेल्या काँक्रिट मिक्सर (क्र.एमएच ०५ जीए ४६०८)ला समोरासमोर टक्कर दिली. या भीषण अपघात बसमधील नऊ प्रवासी व स्वत: काँक्रिट मिक्सर चालक असे १० जण जखमी झाले. या बसमध्ये वाहक चालकासह नऊ प्रवासी होते. अपघातग्रस्त बस ब्रेक फेल झाल्यानंतर दरीच्या बाजूने कलंडली असती तर जीवघेणा अपघात झाला होण्याची शक्यता होती. यावेळी बसचालकाने प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला.

पोलादपूर पोलीस ठाण्याला अपघाताची माहिती मिळताच ठाण्यामधील पोलीस कर्मचारी, कशेडी पोलीस, पोलादपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सर्व जखमींना पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये उपचारासाठी हलविण्यात आले. काँक्रिट मिक्सर चालक निखीलकुमार राजू पासवान (२३) यांनी पोलादपूर पोलास ठाण्यात अपघाताची खबर दिली. पोलादपूर पोलीस ठाण्यात अपघात गुन्हा ०८२०२६ नुसार दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पो. हवालदार बामणे हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## विधान परिषद निवडणूक बिनविरोध?

आवश्यक दहा आमदारांचे सूचक नसल्याने त्यांचे अर्ज बाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुख्य लढत होण्याआधीच निकाल स्पष्ट झाला आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार पक्षनिहाय जागावाटप भाजप ६ जागा, शिवसेना (शिंदे गट) २ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) १ जागा, महाविकास आघाडी (शिवसेना ठाकरे गट) १ जागा. दरम्यान, भाजपकडून सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार, प्रज्ञा सातव, शिवसेना शिंदे गटाकडून नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी, महाविकास आघाडीकडून अंबादास दानवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



### पनवेल महानगरपालिका
### ई-निविदा नोटीस

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. कोरा निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०-४-२०२६ ते दि. ०७-०५-२०२६ पर्यंत सायंकाळी ०५.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा संकेतस्थळावर दि. ३०-०४-२०२६ ते दि.०७-०५-२०२६पर्यंत सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'ब' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे. | रु.२,९३,११२/- | रु.२,०००/-+ ५% GST |

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

### कोंकण रेलवे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार का उपक्रम)
सादर सेवा
### रोजगार अधिसूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी भंडार (प्रकल्प) विभागात करार तत्वावर सहाय्यक साहित्य व्यवस्थापक पदासाठी थेट मुलाखतीद्वारे भरतीसाठी अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/4सी/2026 दिनांक 15/04/2026 प्रसिद्ध केली आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

**अधिसूचना क्रमांक: सीओ/पी-आर/4सी/2026 दिनांक 15/04/2026**

| क्र. सं. | पदाचे नाव / ग्रेड | यूआर | ईडब्ल्यू एस | ओबी सी | एस सी | एस टी | पदांची एकूण संख्या | मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक साहित्य व्यवस्थापक | 1 | - | - | - | - | 1 | 08/05/2026 |

उमेदवारांनी अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशीलांसाठी केआरसीएल संकेतस्थळ www.konkanrailway.com वर लिंक → नियुक्ती → वर्तमान अधिसूचना पाहावी व त्यानुसार अर्ज करावा.

मुख्य कार्मिक अधिकारी

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक १) चिंतामण घनश्याम म्हात्रे, २) प्रिती शैलेश म्हात्रे, ३) भुषण परशुराम म्हात्रे, ४) रंजना परशुराम म्हात्रे, ५) रोशन परशुराम म्हात्रे, ६) निलेश विश्वनाथ म्हात्रे, ७) पुष्पलता विश्वनाथ म्हात्रे, ८) रुपेश विश्वनाथ म्हात्रे आणि ९) सारिका धीरेश म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती / संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- हाशिवरे, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ६/३/ब, एकूण क्षेत्र ००-३३-२० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ४.१२/- पैकी क्षेत्र ००-१६-६० (हे.आर.चौ.मी.)

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ०१/०५/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड
### निविदा सुचना
सन २०२६-२७

मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे खालील काम करणेसाठी इच्छुक व अनुभवी असलेल्या ठेकेदार यांचेकडे द्वि लिफाफा पध्दतीने मोहोरबंद निविदा मागवित आहोत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | सन २०२६-२७ या वित्तीय वर्षा करिता मच्छी मार्केट पथकर फी वसुली करणे. | १,०००/- | ५००/- |

उपरोक्त निविदाबाबतची फॉर्मची विक्री, स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.
१. कोणतीही निविदा अगर सर्वच निविदा त्याबाबत कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
२. सदर कामाची निविदा द्वि-लिफाफा पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे अन्यथा निविदा ग्राहय धरली जाणार नाही
३. लिफाफा क्र.१ मध्ये भरावयाची कागदपत्रे ही निविदा फॉर्म मध्ये नमुद करण्यांत आलेली आहेत. त्यानुसार कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
४. लिफाफा क्र.२ मध्ये निविदापत्रक दर भरुन सादर करावयाचे आहे.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिध्दी | ३०/०४/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | | |
| निविदा भरण्याचा काळावधी | ३०/०४/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | ०७/०५/२०२६ | सायं. ५.०० वाजता |
| निविदा उघडण्याचा काळावधी | | ०८/०५/२०२६ सायं ५.०० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार | | |

म्यु.जा.१६३/बांध/२०२६-२७
मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
**मुरुड जंजिरा, जि. रायगड**
**दिनांक ३०/०४/२०२६**

सही/-
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

सत्यमेव जयते
### महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहीला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
Email ID : arcsalibag@gmail.com

जा.क्र. ७७/ सनिअ/जाहीर नोटीस/कलम १०१/सन २०२६ — दि. ३०/०४/२०२६

**जाहिर नोटीस**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग - रायगड यांचेसमोर**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये अर्ज.**

ज्याअर्थी जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग यांनी दि.०६/०३/२०२६ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणसमोर केलेला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे आणि ज्याअर्थी नियमांचे नियम ८६ब नुसार सर्वप्रतिवादीना नोटीस दि ०६/०३/२०२६ व २४/०३/२०२६ रोजी नोंदणीकृत डाक देय पोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. प्रतिवादी कर्जदार व जामीनदार यांना नोटीस पोच होऊन देखील दिनांक २३/०३/२०२६, ०६/०४/२०२६ व २८/०४/२०२६ च्या सुनावणीस हजर राहिले नाहीत. कर्जदार व जामिनदार यांना सदर कलम अन्वये व नियमाखाली सदर जाहिर नोटीसव्दारे आपले म्हणणे दाखल करण्यासाठी संधी देण्यात येत आहे. तसेच अर्जदाराने जाहिर नोटीस देण्याची विनंती केली आहे.

त्याअर्थी खालील कर्जदार व जामिनदार यांना जाहिर नोटीस देणेत येते की, दि १२/०५/२०२६ दिवसाचे दुपारी १२ वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, काँग्रेसभुवन इमारत पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो. ता. अलिबाग, जि रायगड, पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आलेली आहे तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहिर केलेचे दिवसापासून १० दिवसाचे आत प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिल्यास किंवा बचाव करण्याचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केल्यास अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्वीकारली आहे असे गृहीत धरुन अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एक तर्फी निकालात करण्यात येईल याची नोंद घावी.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा क्र. | दावा रक्कम | जामिनदार क्र १ | जामिनदार क्र.२ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.संचिता केतन बानकर | ०६/०३/२०२६ | २७७/२०२६ | ३१,८२,९८१ | श्री.गोकुळ हरिदास कोळी | सौ.आरती मनिष हार्डे |

दिनांक ३०/०४/२०२६
स्थळ अलिबाग

सही/-
**(अनिल पवार)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग-रायगड**

दिनांक : ०१/०५/२०२६
### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) भक्ती भालचंद्र चोगले, २) प्रिती विजय चोगले, ३) अंजली वसंत चोगले, ४) सायली सुधीर चोगले, यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे मांडवे तर्फे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फे बामणगांव ता.अलिबाग | ६४ | ०-५९-०० पो.ख. ०-००-०० एकुण ०-५९-०० | २.०६ |

दिनांक : ०१/०५/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक नुतन प्रवीण कर्नावट, प्रमोद हंसराज गांधी मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन : -**
**मौजे जांभुळपाडा ; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|
| १०८/२ | एकूण क्षेत्र ०-५६-६० | २-९१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (१५) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. ०१/०५/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
रा-जांभूळपाडा, तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक १) सुनीता गजानन घरत, २) बळीराम एकनाथ मोकल, ३) रमण वसंत म्हात्रे, ४) अनीता नंदन मोकल, ५) मानस नंदन मोकल आणि ६) विनीता नंदन मोकल यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये /विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- हाशिवरे, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ६/५/ब, एकूण क्षेत्र ००-०२-९० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ०.३७/-

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ०१/०५/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक १) मानिषा संदीप नाईक, २) अनीता निशिकांत पाटील, ३) कमला दत्तात्रेय म्हात्रे, ४) संगीता अशोक म्हात्रे, ५) संदीप दत्तात्रेय म्हात्रे, ६) सुमेधा सूर्यकांत गावंड आणि ७) रमाबाई हरिश्चंद्र म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती / संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- हाशिवरे, तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ६/५/अ. एकूण क्षेत्र ००-१८-८० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै. २.६३/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०५/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### शुद्धीपत्रिका

आमचे अशिल यांचे मार्फत दिनांक ३०/०४/२०२६ रोजी मौजे भेरसे, तालुका-अलिबाग, जिल्हा - रायगड येथील भूमापन क्र व उपविभाग ३१५ एकूण क्षेत्र ००-११-१० हे.आर., आकार ०० रु.४५ पैसे बाबत ''दैनिक कृषीवल'' मध्ये आमचे अशील यांचे तर्फे जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती, सदर नोटीस मध्ये जमिनीचे मालक सौ.चारुशीला शरद कोरडे या नावा ऐवजी सौ. चारुशीला किसन कोरडे असे नाव प्रसिद्ध झाले आहे मात्र सदरहू नाव हे सौ. चारुशीला शरद कोरडे असे असून तसे वाचाणेत यावे.
याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक ३०-०४-२०२६

**श्री. राहुल रमेश नाईक**
ॲडव्होकेट
मु.पो नागाव, ता-अलिबाग
९९२२७९८५२८




महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा!
अनंत हिराजी पाटील,
सभापती
श्री. अशोक दत्तात्रेय म्हात्रे,
उपसभापती
स्वप्नील संजय पाटील, संचालक
अनंत हिराजी पाटील, संचालक
यशवंत लखमा भगत, संचालक
सलीम अब्बास तांडेल, संचालक
प्रमोद केशव ठाकूर, संचालक
श्रीम. संध्या नंदकुमार पाटील, संचालिका
श्री.संजय लक्ष्मण पाटील, संचालक
श्रीमती अशुप्रिता उदय वेळे, संचालिका
श्री. गजानन शाम झोरे, संचालक
अभिताभ दत्तात्रेय भगत, संचालक
भास्कर लक्ष्मण भोपी, संचालक
मुकेश मारूती नाईक, संचालक
श्रीम. अर्चना अविनाश हंबीर, संचालिका
श्री. सुभाष जयवंत वागळे, संचालक
श्री. प्रतिक अरूण पाटील, संचालक
श्री. खलील यूनूस तांडेल, संचालक
शुभेच्छुक
कृषी उत्पन्न बाजार समिती अलिबाग संचालक मंडळ २०२३-२०२८




महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा!
रजि. क्र. के. बी. ए. /आर. एस. आर. १३९/१९८४ दि. १७/२/१९८४
सावतामाळी
नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग
सुवर्णसुरक्षा
सोनेतारण योजना
नवीन सोने खरेदीसाठी कर्ज उपलब्ध
व्याजदर फक्त १०%
मुदत १२ महिने
प्रोसेसिंग फी फक्त ०.१०%
किमान कागदपत्रे
त्वरीत मंजूरी
आपल्या विश्वासाची सोबत
विश्वास... सुरक्षा... आर्थिक साथ...
* नियम व अटी लागू.
*** अधिक माहितीसाठी संस्थेमध्ये भेट द्या. ***
संपर्क - ८६९८०६२३३५




महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा!
शुभेच्छुक
मा.श्री. राजेंद्र जुईकर
अध्यक्ष
मा.श्री. अजित नामदेव भगत
उपाध्यक्ष
रा.जि.सह. बँक कर्मचारी संघ

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
महाराष्ट्र शासन
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा!
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा...
१ मे
महाराष्ट्र दिनाच्या
आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in /MaharashtraDGIPR /MahaDGIPR
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री




महाराष्ट्र शासन
म.रा.र.वि.म.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.)
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग
'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा
महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय
मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक
वेगवान आणि सुरक्षित.
मिसिंग लिंकसह अनुभवा वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवास
जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५मीटर)
लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा
६५०मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच रस्त्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर)
शुक्रवार, दिनांक ०१ मे २०२६
वेळ : दुपारी १२:३० वाजता
स्थळ- मिसिंग लिंक वरील पूल क्र.१, खोपोली एक्झिटजवळ, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग, जि. रायगड.
महामार्ग विकासासाठी सदैव कटिबद्ध!
www.msrdc.in /msrdcofficial /Maharashtra State Road Development Corporation
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
मेघना साकोरे-बोर्डीकर
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

## पाऊसपाण्याची चिंता

यंदा पाऊसमान कमी राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. एल निनोच्या प्रभावाने हे घडणार आहे. सुरुवातीच्या काळात पाऊस वेळेवर येईल व त्याचे मान ठीक असेल. पण नंतर तो घटत जाईल. तसेच उत्तरार्धात त्याच्यात खंड पडेल असे सध्याचे भाकित आहे. मुंबईमध्ये सावधगिरीचा उपाय म्हणून पंधरा मेपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. मुंबईची लोकसंख्या सुमारे दीड कोटी आहे. तिला पाणी पुरवण्यासाठी सात धरणे बांधण्यात आलेली आहेत. त्यामध्ये सध्याचा पाणीसाठा केवळ २८ टक्के शिल्लक आहे. हे पाणी जुलैपर्यंत पुरेल आणि राखीव साठा वापरला तर १७ ऑगस्टपर्यंत पुरेल असा अंदाज आहे. मात्र तरीही मुंबई पालिका अधिकारी जोखीम पत्करण्यास तयार नाहीत. पाऊस उशिरा आला वा पुरेसा आला नाही तर अडचण होऊ शकते. शिवाय उरलेल्या महिनाभरात तीव्र उन्हामुळे पाण्याचे वेगाने बाष्पीभवन होण्याचा धोका आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. बाकीच्या शहरांमधील स्थितीही अशीच आहे. पुण्यातही दर काही दिवसांनी पाणीपुरवठा बंद केला जात असतो. सोलापूर, संभाजीनगर, अहिल्यानगर अशा शहरांमध्ये तर रोज पालिकेचा पाणीपुरवठा होईल याची खात्री नसते. कोल्हापूरच्या काळम्मवाडी धरणातील साठा कमी होत असून गुरुवारपासून अनेक भागांमध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जाऊ लागला आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्व मोक्याच्या शहरांना पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये पुरेसे पाणी आहे. पण हे पाणी ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल अशा रीतीने नियोजन करण्याचे आदेश जलसंपदा विभागाकडून देण्यात आले आहेत. परिणामी आता ठाण्यात आठवड्यातून एक दिवस पुरवठा बंद ठेवला जाणार आहे. जिथे मुबलक पाऊस होतो तिथेही मार्चनंतर पाण्याची टंचाई जाणवू लागते हा दरवर्षीचा अनुभव आहे. रत्नागिरीमधील सहा तालुक्यांमध्ये १५ टँकरने पाणीपुरवठा चालू करण्यात आला आहे. मंडणगड, चिपळूण, खेड आणि रत्नागिरी तालुक्यातील अनेक गावांची स्थिती बिकट झाली आहे. कोकणात मे महिन्याच्या अखेरीस विहिरींचे पाणी आटणे ही समस्या पूर्वापारची आहे. पण नागरीकरणामुळे त्यात भर पडली आहे.

### रायगड ते मेळघाट

रायगड जिल्ह्यात अलिबागपासून ते पोलादपूर किंवा कर्जतपर्यंत सर्वत्र कमीअधिक फरकाने पाणीटंचाई जाणवू लागली आहे. कुठे कमी तर कुठे जास्त असली तरी ती आहे ही वस्तुस्थिती आहे. हीच स्थिती घाटमाथ्यावरच्या भागातही आहे. कोल्हापूर व साताऱ्यात दरवर्षी तुफान पाऊस होतो. इथून उगम पावणाऱ्या व जाणाऱ्या कृष्णेला पूर येतो. पण उन्हाळ्यात इथे दुर्भिक्ष्य जाणवते. तिथे ३५ गावांमध्ये २९ टँकरने पाणी द्यावे लागले आहे. शेजारच्या पुणे जिल्ह्यामध्येही फेब्रुवारी महिन्यापासूनच टँकरची मागणी वाढली असून टँकरच्या ५० हजार फेऱ्या झाल्या आहेत. तिकडे विदर्भामध्ये मेळघाट, चिखलदरा ही आजवर थंड हवेची ठिकाणे म्हणून प्रसिध्द होती. उन्हाळ्यात पर्यटक तिथे गर्दी करत असत. पण आता ती ओस पडली आहेत. कारण, तिथलेही दिवसाचे तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअसच्या आसपास पोचले आहे. शिवाय खेड्यापाड्यांमधील आदिवासी भागांमध्ये भीषण पाणीटंचाई जाणवू लागली आहे. या संदर्भात तेथील सामाजिक कार्यकर्ते बंडू साने व इतरांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर निर्णय देताना प्रत्येक गावाला दर दिवशी किमान एका टँकरने पाणी पुरवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. सरकारला स्वतःहून हे सुचू नये व असे आदेश द्यावे लागावेत हेच भयंकर वास्तव आहे. या भागातील धारणी, चिखलदरा या मुख्य गावांमधील विहिरी पूर्णपणे आटल्या असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या स्थितीत खरे तर प्रशासनाने त्वरीत कारवाई करायला हवी होती. पण कार्यकर्त्यांना न्यायालयामध्ये जाऊन हे आदेश घेऊन यावे लागावेत हेच खेदजनक आहे. विदर्भ व मराठवाड्यातील अनेक जिल्ह्याची व तालुक्याची ठिकाणे पाणीटंचाईने ग्रस्त असून ही स्थिती सर्वांच्याच अंगवळणी पडली आहे. बाजारात विकत पाणी मिळण्याची व्यवस्था कंपन्यांच्या कृपेने सर्वदूर पोचली आहे. त्यामुळे बहुदा या प्रश्नाची तातडी कोणालाच उरलेली नाही. या प्रश्नावर पूर्वीप्रमाणे आंदोलने होत नाहीत व मोर्चेही निघत नाहीत. पाणी मिळणे हा आपला हक्क आहे व हा पुरवठा करणे हा राज्य सरकारची जबाबदारी आहे हेच जणू जनता विसरून गेली आहे.

### डेटा सेंटर नावाचा राक्षस

सरकारवर आता कोणत्याच विषयात जनतेचा दबाव उरलेला नाही. विषय येतात व विसरले जातात. सरकारची कॉलर पकडून त्यांना विचार करायला लावणारे व निर्णय घ्यायला लावणारे कार्यकर्ते कमी झाले आहेत. मुंबईमध्ये वगैरे पाणीटंचाई जाहीर केली की आपली जबाबदारी संपली असे सरकारला वाटत असावे. पण या प्रश्नाचा मूलभूत विचार करावा असे कोणालाही वाटत नाही. मुंबईसारख्या शहराला किती वाढू द्यायचे याचा विचार करण्याची वेळ खरे तर केव्हाच निघून गेली आहे. पण राज्यकर्ते अजूनही विकासाच्या नावाखाली चहूबाजूचे प्रदेश मुंबईला जोडत निघाले आहेत. कालपर्यंत गावे असलेल्या व आपल्या पाण्याची गरज आपण भागवत असलेल्या वस्त्या आता मुंबईचा भाग होऊ लागल्या आहेत. त्यांचे नैसर्गिक स्त्रोत नष्ट होत आहेत. ते नव्याने ज्या शहरांमध्ये सामील होत आहेत तिथल्या पालिका त्यांना पाणी पुरवण्याच्या स्थितीत आहेत की नाहीत याचा विचार केला जात नाही. त्यामुळे ठाण जिल्ह्यातील बहुसंख्य महापालिका शहरांमध्ये सामील झालेल्या गावांचे हाल होत आहेत. तिकडे पुण्यातही हीच स्थिती आहे. खराडी, हडपसर, कोंढव्यापासून ते इकडे आयटी उद्योगांसाठी प्रसिध्द पावलेली हिंजवडीच्या नजीकची गावे पुण्यात वेगाने सामील केली गेली. पण ना तिथे धड पाणी पुरवले जात ना तिथला कचरा उचलला जात. गेल्या वर्षी पुणे शहरात सामील असूनही पाणी शुध्दीकरण होत नसल्याने धायरी परिसरात हगवणीचे बळी गेले होते व साथी पसरल्या होत्या. असे काही झाले की यंत्रणा तात्पुरती धावपळ करते व नंतर हे विषय विसरले जातात. सध्याचे राज्यकर्ते तर मोठमोठे रस्ते, इमारती उड्डाणपूल यांनाच विकास मानते. आयटी, एआय अशी भाषा ते बोलते. जणू आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआय पाणी निर्माण करणार आहे असे बहुदा सरकारला वाटत असावे किंवा जनतेनेही त्यावर विश्वास ठेवावा असा त्याचा प्रयत्न असावा. त्यातच आता डेटा सेंटर्स नावाचा नवा परवलीचा शब्द आला आहे. गुगलपासून तमाम सगळ्या कंपन्या आपली डेटा सेंटर्स भारतात स्थापन करण्याच्या मागे आहेत. याचे कारण असे की, या डेटा साठवणाऱ्या सर्व्हर्सना थंड ठेवण्यासाठी प्रचंड प्रमाणावर पाणी लागते. अमेरिकेत अशा सेंटर्सना पाण्याच्या मुद्द्यावरूनच विरोध होत आहे. त्यामुळे ही सेंटर्स भारतासारख्या देशात डम्प केली जात आहेत. इथे डेटा सेंटर्स व काही शेकडा नोकऱ्या आल्या की आपल्याला विकास झाल्यासारखे वाटेल. पण यासाठी किती पाणी नष्ट होईल व त्याचा आपल्याला किती भीषण फटका बसेल हे कालांतरानेच कळेल. पण तोवर कदाचित उशीर झालेला असेल.

**विचार**

# गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान अंगिकारुया

**गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान हे दुःखमुक्ती, समता, करुणा आणि विज्ञाननिष्ठ विचारांवर आधारित आहे. मानवी जीवनातील दुःखाचेमुळ कारण तृष्णा असल्याचे सांगून बुद्धांनी चार आर्य सत्ये आणि अष्टांगिक मार्गाद्वारे निर्वाण (सर्वोच्च सुख/मुक्ती) मिळवण्याचा मार्ग दाखविला आहे. हे तत्त्वज्ञान तर्कशुद्ध आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे आहे.**



अरविंद मोरे

**गौतम बुद्धांनी सांगितलेले चार आर्य सत्ये**

१. दुःखः जगात दुःख आहे (जन्म, मरण, आजार शोक) २. दुःख समुदायः दुःखाचे कारण तृष्णा किंवा इच्छा आहे. ३. दुःख निरोधः तृष्णा नष्ट केल्यास दुःख दूर होऊ शकते (निर्वाण). ४. दुःख निरोधः गामिनी प्रतिपदा.

दुःखातून मुक्ती मिळवण्याचा मार्ग अष्टांगिक मार्ग आहे. १. सम्यक दृष्टीः सत्य काय आहे ते समजणे. २. सम्यक संकल्पः वाईट विचारांचा त्याग करून चांगले विचार करणे. ३. सम्यक वाचाः सत्य आणि गोड बोलणे. ४. सम्यक कर्मातः अहिंसक आणि चांगले वर्तन करणे. ५. सम्यक आजीविकाः प्रामाणिक मार्गाने उपजीविका करणे. ६. सम्यक व्यायामः मनावर ताबा मिळवून मानसिक शक्ती वाढवणे. ७. सम्यक स्मृतीः मनाची एकाग्रता राखणे. ८. सम्यक समाधीः खऱ्या ज्ञानाची प्राप्ती करणे. मूलभूत विचार अनित्यता– जगात कोणतीही गोष्ट शाश्वत नाही, सर्व काही परिवर्तनशील आहे. अनिस्वरवाद– बुद्ध देव किंवा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवत नाहीत ते कर्माला महत्त्वाचे मानतात. अहिंसा– प्राणीमात्रे वर दया करणे आणि हिंसा न करणे. पंचशील– पाच नियम (हिंसा न करणे, चोरी न करणे, व्यभिचार न करणे, खोटे न बोलणे, नशा न करणे (पाळणे).

बुद्धांचे तत्वज्ञान हे अंधश्रद्धेवर आधारित नसून ते मानवाला तर्कशुद्ध विचार करायला आणि स्वतः च्या दुःखातून स्वतःच मार्ग काढायला शिकवते. ज्याला अत्ता दीप भव (स्वतःचा प्रकाश स्वतःच व्हा) असे म्हटले जाते. सिद्धार्थ गौतम बुद्ध म्हणतात, जगात दुःख आहे. दुःखाचे कारण तृष्णा आहे. मानव जेव्हा जन्माला आल्यापासून मरेपर्यंत त्याची तृष्णा पूर्णच होत नाही. एक इच्छा पूर्ण झाली की काही कालांतराने दुसरी इच्छा मनात उत्पन्न होते. ती पूर्ण होईस्तव मानव हा दुःखी असतो. ही इच्छा पूर्ण झाली की काही दिवस तो शांत राहतो आणि काही कालांतराने नवीन इच्छा तयार होते. परत तो नाराज होतो. असे कालचक्र हे जन्मापासून मृत्यूपर्यंत सुरूच राहते. सध्या जगात युद्ध सुरू आहे, ही पण एक अमेरिकेची तृष्णाच आहे. वास्तविक अमेरिका हा बलाढ्य देश आहे. त्याला कशाचीही कमी नाही. परंतु, त्या देशाला संपूर्ण विश्वावर राज्य करायचे आहे. हुकूमत गाजवायची आहे. म्हणून अमेरिकेचे दुःखाचे कारण तृष्णा आहे. दुसरे असे की, अमेरिकेला संपूर्ण तेलसाठे त्यांच्याच नियंत्रणात पाहिजे आहेत, ही सुद्धा एक तृष्णाच आहे. म्हणून दुःख आहे. गौतम बुद्धांनी पंचशीलाचे तत्तवज्ञान सांगितले आहे. या पंचसूत्राची संपूर्ण मानव जातीचा जीवनमार्ग कसा सुखकर होईल, हे एकदम साध्या सोप्या मार्गाने सांगितले आहे.

**काय आहे हे पंचसूत्री तत्त्वज्ञान?**

१. हिंसा करू नयेः हिंसा ही कुठलीही वाईटच आहे. मग ती शिकारीची असो की बदल्याच्या भावनेतून घेतलेली असो. हिंसा केल्यामुळे द्वेष आणि वैर निर्माण होते. वैराने वैर वाढते. सध्या युद्ध सुरू आहे. या युद्धात बरीच हिंसा झाली आहे. या हिंसेत पहिल्याच दिवशी इराणच्या राष्ट्राध्यक्षाची हत्या करण्यात आली. ज्या कोणी देशाच्या राष्ट्राध्यक्षाची हत्या होईल, त्यामध्ये बदल्याची भावना नक्कीच निर्माण होईल. कारण नसताना इराणमध्ये मुलींच्या शाळेवर हल्ला करण्यात आला. त्यात नाहक शेकडो मुलींचे प्राण गेले. त्यात कोवळ्या मुलांचा काय दोष आहे? त्यात मुलं दगावली, त्यांच्या बालकांना किती दुःख झाले असेल आणि त्यांच्या मनात किती राग निर्माण झाला असेल, हे साहजिकच आहे. म्हणून हिंसा करू नये. जीव जातो व तो कितीही क्रूर असला तरी याची रुख राख त्यांच्या मनामध्ये राहतेच की आपण उगीच हत्या केली म्हणून. या हिंसेमध्ये ज्याची हत्या होते तो पण मरतो आणि जो करतो तो पण मरतो. हिंसा दरवेळी हत्येची किंवा जीव घेणारीच नसते. कधी कधी शाब्दिक हिंसा सुद्धा असते. काहींना कारण नसताना मोठ्या आवाजात अवार्च शिवीगाळ करण्याची सवय असते. इतरांसमोर अपमान करण्याची सवय असते. त्यामुळे बरीच मनं दुखावली जातात. ही शाब्दिक हिंसा काही प्रत्यक्ष हिंसेपेक्षा कमी नसते. त्यामुळे सगळीकडे अशांतता पसरू शकते.

२. चोरी न करणेः कुठलीही चोरी करणे हे वाईटच कारण की इतरांनी जमवलेली संपत्ती कित्येक वर्षांची मेहनत असते. चोरी केल्यामुळे ज्याने धन संपत्ती जमवली आहे, त्याची आयुष्यभराची कमाई चालली जाते. आणि अतोनात दुःख होऊन त्याला भयंकर यातना सुद्धा होतात. तसेच, जो चोरी करतो तो जर पकडला गेला तर त्याला शिक्षा होते. वाईट कृत्य केल्यामुळे तरुणाच्या करिअरचे आयुष्य भराचे नुकसान होऊ शकते. कुठलीही चोरी करणे वाईटच.

३. व्यभिचार न करणेः व्यभिचार करणे हे फार वाईटच. आज बरेच ढोंगी बाबा हे अनेक महिलांना खोटे आमिष दाखवून व्यभिचार करत असतात. त्यामुळे त्या महिलांची बदनामी समाजात होते. व्यभिचार केल्यामुळे चरित्रावर डाग लागतो. तो कधीही पुसून निघत नाही. अशा महिला, पुरुषांना वाईटच बघितल्या जात. समाज अशा गोष्टींना मान्यता देत नाही. त्याची सामाजिक प्रतिष्ठा राहत नाही. व्यभिचार केल्यामुळे शारीरिक रोग सुद्धा होण्याचा धोका असतो. त्यामुळे त्याची लागण त्याला त्याची लागण त्याला होऊन कुटुंबाचे, समाजाचे व शेवटी राष्ट्राचे आरोग्य बिघडते. व्यभिचारामुळे बराच आर्थिक भुर्दंड सुद्धा सोसावा लागतो. त्यामुळे भांडण होऊन कधी कधी टोकाचे भांडण होऊन हत्या पण होते. त्यामुळे सिद्धार्थ गौतम बुद्ध म्हणतात शीलाला खूप महत्त्व आहे. हे आपण जपले पाहिजे. म्हणून व्यभिचाराच्या चार हात दूर असलेलेच बरे.

४. खोटे न बोलणेः बऱ्याचदा खोटे बोलल्यामुळे इतरांचे अतोनात नुकसान होते. खोटे बोलण्याची बऱ्याच जणांना सवय असते. काही जणांना जलन असते. मत्सर असतो. त्याला इतरांचे चांगले बघवत नाही. मग तो खोटे बोलून त्याची प्रतिमा कारण नसताना मलिन करतो. हे जरी खरे असले की सत्य हे कधीही पराभूत होत नाही, पण त्याला बराच अवधी लागतो. तोपर्यंत बरेच नुकसान झालेले असते. खोटे बोलून समाजात दंगा मस्ती होऊन हिंसा पण होऊ शकते. एवढे नुकसान खोटे बोलल्यामुळे होऊ शकते. खोटे काही दिवस इतरांना परेशान जरूर करू शकते. पण ज्यांना इतरांना कळते की, ही व्यक्ती खोटे बोलते तेव्हा या खोटे बोलणाऱ्याचे बरेच नुकसान होते. त्याच्यांवर कोणीही विश्वास ठेवत नाही. या व्यक्तीचे आयुष्यभर अतोनात नुकसान होते म्हणून खोटे बोलू नये.

५. नशा न करणेः कुठलीही नशा करणे ही वाईटच. नशा केल्यामुळे आपले स्वास्थ बिघडते. शरीराचे वाटोळे होते. नशा केल्यामुळे आपल्या शरीराचे महत्त्वपूर्ण अवयव हे निकामी होतात. जे की आपल्यासाठी फार अमूल्य असतात. बरीच तरुण मुले नशेच्या अधीन गेलेले असतात. त्यामुळे त्यांच्या करिअरवर वाईट परिणाम होतो. नशेच्या आहारी गेल्यामुळे कुटुंबाचा आधार चालला जातो. तरुणाई नशेत गेली तर कुटुंबाचे, समाजाचे व अर्थात राष्ट्राचे सुद्धा नुकसान होते. बऱ्याचदा ज्याच्यावर कुटुंब अवलंबून असते, तेच नशेच्या आहारी गेलेले असतात यामुळे कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. नशेसाठी बरेच पैसे खर्च होतात. कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे फार कठीण जात. त्यामुळे कुटुंबाची हेळसांड होते. मुळाबाळांच्या शिक्षणावर, आरोग्यावर पैसे खर्च करण्यासाठी शिल्लक राहत नाही. मुलांचे शिक्षण होत नाही. योग्य शिक्षणाची संधी न मिळाल्यामुळे मुलांचे करिअर कायमच न भरून निघणार नुकसान होते. असे पाच अनमोल पंचशीलाचे मूलमंत्र आहेत.

एवढा सोपा जीवनाचा महत्त्वपूर्ण संदेश या पंचशीलाने दिलेला आहे. जे की सामान्य नागरिकांना अंगीकारणे शक्य आहे. हिंसा न करणे, चोरी न करणे, व्यभिचार न करणे, खोटे न बोलणे व नशा न करणे या पंचशीलाचे कोणीही सहजपणे पालन करू शकतो व आपले मानवी जीवन विना त्रासाचे आरामात जगू शकतो. या पंचशीलाकडे आपण जरा बारकाईने बघितले की या पंचसूत्रांचे पालन न केल्यामुळेच तर मानवाच्या जीवनात समस्या निर्माण होतात. हिंसा केली की शिक्षा, चोरी केली की शिक्षा, व्यभिचार केला की शिक्षा, खोटे बोलले की शिक्षा व नशा केली की शिक्षा होते किंवा गुन्हा नोंदविला जातो. या मानवाच्या जीवनात ज्या काही कटकटी निर्माण होतात ते केवळ पंचशीलाचा अवलंब न केल्यामुळेच. म्हणून सुखी जीवनासाठी मानवाने सिद्धार्थ गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान अंगीकारणे गरजेचे आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सुद्धा हे लागू होते, कारण की गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान हे वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे आहे.

# गर्जा महाराष्ट्र माझा!




रणवीरसिंग राजपूत

संयुक्त महाराष्ट्राचा लढा म्हणजे धगधगते यज्ञकुंडच. खरं तर, हा लढा मराठी अस्मितेचा हुंकार होता. या पार्श्वभूमीवर सर्वधर्मीय, सर्वजातीय, सर्वपक्षीय नेते या लढ्यात स्वयंस्फूर्तीने सामील झाले होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व्हावी, या उद्देशपूर्तीसाठी लेखक, साहित्यकार, संपादक, पक्षीय नेते, समाजसेवक, विचारवंत, कवी, शाहीर यांनी संघटितपणे प्रखर लढा दिला. आंदोलने केली. मोर्चे काढले. याकारणी आंदोलकांना पोलिसांच्या रोषाला सामोरे जावे लागले. आंदोलकांवर अमानुष लाठीचार्ज झाला. काहींना कारावासही भोगला लागला. मुंबई राज्याच्या तत्कालिन सरकारच्या आदेशान्वये पोलिसांकडून आंदोलकांवर अंधाधुंद गोळीबारही करण्यात आला. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एक-दोन नव्हे तर, तब्बल १०६ जणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. परंतु, त्यांचे हौतात्म्य वाया गेले नाही. अखेर मुंबई राज्याचे माजी मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांना मऱ्हाटमोळ्या शुरवीरांपुढे शरणागती पत्करावी लागली.मित्रहो, या सर्वांच्या बलिदानाची फलश्रुती म्हणजे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली अन् खऱ्या अर्थाने हा सोनियाचा दिवस ठरला. विशेष म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला आज ६६ वर्षे पूर्ण होत आहेत. या महान मराठमोळ्या हुतात्म्यांना विनम्र अभिवंदन!

भारताचे तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते नव महाराष्ट्राची मुहूर्तमेढ झाली.आणि बघता-बघता मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे स्वप्न साकार झाले. संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्म्यांचे चिरकाल स्मरण रहावे, या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने मुंबईतील फ्लोरा फाऊंटन येथे हुतात्मा स्मारक उभारले. अशा थोर हुतात्म्यांना आम्ही समस्त महाराष्ट्रीय त्रिवार अभिवादन करतो. नव महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान वंदनीय यशवंतराव चव्हाण यांना प्राप्त झाला. राजभवन येथे नवनिर्मित राज्याच्या उद्घाटनप्रसंगी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री वंदनीय यशवंतराव चव्हाण म्हणाले की, नव महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे आपल्याला भरभराटीचे अन् सुखाचे दिवस येतील. मराठी भाषिक प्रदेश एकत्र करून जनताभिमुख सरकार देणे हे राज्य स्थापनेचे मुळ धोरण आहे, हे सर्वांनी ध्यानी ठेवावे. राज्यातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना समान न्याय-समान संधी देणे ही सरकारची मुख्य भूमिका राहील. महाराष्ट्र हे सदैव सर्वधर्मसमभावचे प्रतिक म्हणून देशाला दिशा देईल. जय हिंद-जय महाराष्ट्र!

नवनिर्मित महाराष्ट्राला उद्देशून कविवर्य कृ. कोल्हटकर म्हणतात, 'बहु असोत सुंदर संपन्न महा... प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा!' आपला महाराष्ट्र हा प्राणापेक्षाही प्रिय आहे.सर्वदृष्टीने गुणसंपन्न आहे. कवी कुसुमाग्रज आपल्या उत्कट शब्दांत म्हणतात, 'माझ्या मराठीमातीचालावाललाटासीटिळा,तिच्यासंगेजागतील मायदेशातील शिळा!' महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. माय मराठीचा गौरव करताना सुरेश भट म्हणतात, 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी, धर्म-जात- पंथ एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी!'

संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा मराठी माणसाच्या दृष्टीने अस्मितेचा प्रश्न होता. संयुक्त महाराष्ट्रावरील कवणे गाऊन शाहिरांनी सारा महाराष्ट्र दणाणून सोडला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १९३८ साली मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर आपल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे सूतोवाच केले. त्यानंतर पुढे २८ जानेवारी १९४० रोजी संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना झाली. जात, धर्म, पंथ व पक्षीय अभिनिवेश बाजूला सारून सारा महाराष्ट्र एकवटला. या लढ्यात सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी कर्तव्यबुद्धीने सहभाग घेतला. सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, कॉ. डांगे, आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, अहिल्याबाई रांगणेकर, नाना पाटील, कृष्णा देसाई, डॉ. टी.आर.नरवणे, आर. डी. भंडारे, दिनू रणदिवे, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर, शाहीर आत्माराम, ग.त्र्य. माडखोलकर, प्रा. मधू दंडवते, नानासाहेब गोरे, अनुताई लिमये, भाऊसाहेब हिरे, नानासाहेब कुंटे, केशवराव जेधे, मधू लिमये, डॉ. धनंजयराव गाडगीळ, तुळसीदास जाधव, दादासाहेब गायकवाड आदी मान्यवरांनी एकसंध होऊन संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे रणशिंग फुंकले अन् विजयी झाले. या सर्व प्रभृतींना त्रिवार मानाचा मुजरा! वास्तवात, नव महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर साऱ्या महाराष्ट्रात आनंदाची लाट उसळली होती.जागोजागी विजयाच्या पताका फडकल्या. नव राज्याच्या निर्मितीमुळे सर्वत्र जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. ढोल-ताशे, तुतारींच्या निनादात जयघोष करत हजारोंच्या संख्येने भूमिपुत्रांनी हा सोनियाचा दिवस नाचत-गात, गुलाल उधळत मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला. याप्रसंगी मराठी माणसाचे ऐक्य अन् सामर्थ्याचे खरे दर्शन झाले. त्याची परिणती म्हणजे तत्कालिन केंद्र सरकारसह मुंबई राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांना अखेर मराठी भूमिपुत्रांपुढे गुडघे टेकावे लागले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जसे मराठी क्रांतीवीरांनी बलिदान दिले, त्याप्रमाणेच मराठी भूमिपुत्रांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जणू आपल्या रक्ताचा अभिषेकच केला. अशा महान मराठमोळ्या भूमिपुत्रांना आम्ही त्रिवार मानाचा मुजरा करतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अन् उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या संयुक्त प्रयत्नातून शाहीर साबळे यांच्या 'गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताला राज्यगीताचा दर्जा मिळाला, हे राज्याच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.

**महाराष्ट्र चिराऊ होवो!**
**जय शिवराय! जय महाराष्ट्र!**

**लोकसंसद**

### जय जय महाराष्ट्र माझा!'

१ मे १९६० रोजी स्थापना झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला आज १ मे ला ६६ वर्षे पूर्ण होत आहेत. आज महाराष्ट्र दिन साजरा करत असताना मनस्वी आनंद होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळ असो वा स्वातंत्र्योत्तर काळ, महाराष्ट्राने नेहमीच विविध क्षेत्रांत देशाला दिशा दाखवली आहे. ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, व्यापार, उद्योग, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, सांस्कृतिक, क्रीडा, पर्यटन, चित्रपट, नाटक, संगीत, कला, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात संपन्न असलेल्या महाराष्ट्राने राष्ट्र उभारणीसाठी भरीव योगदान दिले आहे. उदाहरणार्थ देशपातळीवर राबवली जाणारी रोजगार हमी योजना ही महाराष्ट्रात प्रथम सुरु झाली होती. मात्र असे असले तरी या आनंदावर विरजण घालणाऱ्या सांप्रतच्या गोष्टींना नजरेआड करून चालणार नाही. कारण काळ जसजसा पुढे सरकतो आहे तसतशा राज्यात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शेतकरी आत्महत्या आणि वाढत्या बेरोजगारीने उग्र स्वरूप धारण केले आहे. त्या सोडविण्यासाठी राज्याची कसोटी लागणार आहे. राज्यात ध्वनी, वायू, जल प्रदूषणाची समस्या मोठी असून सर्वच ठिकाणी नद्या, नाले मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरांकडे येणाऱ्या लोंढ्यांमुळे शहरांच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण पडत आहे. महिला अत्याचाराचा आणि एकूणच गुन्हेगारीचा आलेख वाढत आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन आज सहासष्ट वर्षांचा दीर्घ काळ उलटून गेला आहे, तरीही मराठी भाषेची सर्वत्र उपेक्षा होत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. खरे तर अनेक समस्यांचा डोंगर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यामुळे 'जय जय महाराष्ट्र माझा' असे म्हणत असताना राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि सामाजिक समतेसाठी सर्वांनीच महाराष्ट्राच्या सद्य परिस्थितीची जाणीव ठेवली पाहिजे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**दिनविशेष**

# कामगारांचा हक्काचा दिवस

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधान न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस २) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी ३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा ४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम ५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी ६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा ७) समान कामासाठी समान वेतन या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉँब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, ‘‘ कामगार – कामगारात, राष्ट्रा – राष्ट्रात, धर्मा – धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.‘‘ लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा !

**श्याम ठाणेदार**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ मे

१) श्री.अनंत केशव देवघरकर नागडोंगरी, अलिबाग, १-५-१९४१
२) श्री.चंद्रकांत बाळाराम पाटील चेंढरे, अलिबाग, १-५-१९४६
३) श्री.अशोक जनार्धन म्हात्रे मु.सातिर्जे, अलिबाग, १-५-१९४९
४) श्री.अंकुश हरी सावंत अलिबाग, १-५-१९४१
५) श्री.अरूण बापू राऊत नवेदर-नवगावं, अलिबाग १-५-१९५३


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**


# कामगाराच्या कामाचे मोल ठरवेल तो सुदिन!

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणतात, ही पृथ्वी शेषनागाच्या फण्यावर नाही तर कामगारांच्या हातावर तारली आहे. कामगार हे उत्पादन तयार करणारे एकमेव स्रोत या पृथ्वीतळावर आहे. पण या कामगारांची अवस्था मात्र फार वाईट आहे. शेतकरी, शेतमजूर राब राब शेतात राबतात, अन्नधान्य पिकवितात; परंतु त्यांनाच ते अन्नधान्य खायला मिळत नाही. अनेक कामगार मोठ-मोठ्या बिल्डिंग बांधतात, परंतु त्यांनाच राहायला घर नाही. कामगार कापूस पिकवितात; परंतु त्यांनाच परिधान करायला कपडे नाहीत.**





**अरविंद मोरे**

कारखान्यात सायकली, मोटार सायकली, मोटारी, रेल्वेचे डब्बे, बस, ट्रक, ट्रॅक्टर आधीचे उत्पादन करतात. परंतु, ही वाहने त्यांना उपभोगायला मिळतच नाहीत. त्याचा उपयोग त्यांना करता येत नाही. त्यांना पायदळी प्रवास करावा लागतो. शेतकरी आंब्याचे उत्पादन घेतो, पण तोच आंब्याचा स्वाद घेऊन शकत नाही. शेतकरी तेलबियांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतो, पण त्यालाच रोजच्या भाजीच्या फोडणीला तेल नाही, अशी दयनीय अवस्था कामगारांची सर्वच क्षेत्रात झाली आहे.

कारखानदार, भांडवलदार यांचा मुख्य उद्देश हा केवळ नफा कमविणे असतो. नफा कमविण्यासाठी ते कामगारांची कपात करतात. मालकाची नफा कमविण्याची पद्धत ही सकारात्मक नसते, ती नेहमीच नकारात्मक असते. मालक हा नफा कमविण्यासाठी उत्पादन वाढवत नाही तर तो कर्मचारी/कामगार कपात करतो. नफा वाढविण्याच्या नादात कर्मचाऱ्यांना कमी वेतन दिले जाते. या अल्पशा वेतनामुळे काम गारांचे शोषण होते. त्याला या वेतनात निकृष्ट जीवन जगावे लागते. त्याच्या स्वास्थावर विपरीत परिणाम होतो.

सध्या कायमस्वरूपी रोजगार जवळपास बंदच झाला आहे. कंत्राटीच्या भुताने सर्व कारखानदार, भांडवलदार, मालक आणि सरकार फारच प्रभावित झालेले आहे. कायमस्वरूपी रोजगार म्हणून सरकार जबाबदारी घ्यायला तयार नाही. कारण की सरकारला, मालकाला ते परवडत नाही. कायमस्वरूपी कामगार नेमला तर त्याला पी. एफ., ग्रॅज्युएटी व पेन्शन आदी द्यावे लागतात. हे तर कामगाराचा कामगार कायद्याप्रमाणे त्याचा हक्कच आहे. परंतु, कामगारांच्या बाजूने सर्व कायदे अस्तित्वात असूनसुद्धा त्याला न्याय दिला जात नाही.

तसे बघितले तर कामगारवर्ग हा समाजाचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु त्याच्या नशिबी गरिबी, संघर्ष आणि वेदनाच येतात. कामगारांची व्यथा ही केवळ मजुरीची नाही तर त्यांच्या हक्कांची, सुरक्षिततेची आणि मानवी प्रतिष्ठेचीही कथा आहे.

अनेक कामगारांना, विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना विशेष करून बांधकाम मजूर, विडी कामगार यांना किमान वेतन मिळत नाही. पण वास्तविकतः प्रत्येक राज्यात किमान वेतनाचा कायदा आहे. पगार वेळेवर न देणे ही सुद्धा मोठी समस्या आहे. ज्यामुळे त्यांचे संपूर्ण कुटुंब संकटात सापडते.

नालेसफाई करणारे कामगार, वीटभट्टी कामगार किंवा कारख्यान्यातील कामगारांना जीवितास धोका असलेल्या परिस्थितीत काम करावे लागते. नालेसफाई करताना विषारी वायूने अनेकदा कामगारांचा मृत्यूसुद्धा होतो.

पगार कमी असल्याने अनेक कामगारांना आपली मुले शाळेत न पाठवता कामावर पाठवावी लागतात. वास्तविक आपल्या भारतीय संविधानात बालकामगारास काम करणे हे निषिद्ध मानले आहे. तरीही बालकामगारांची संख्या वाढते आहे, हे देशाचे दुर्दैव आहे. त्यामुळे गरिबीचे दृष्टचक्र कमी होण्याऐवजी ते सुरुच आहे.

कामगारांची स्थिती सुधारणे फार गरजेची आहे. यामध्ये कामगारांचे शोषण थांबविणे, त्यांना सामाजिक सुरक्षा देणे आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता सुनिश्चित करणे हा आहे.

कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी काही प्रमुख सुधारणा आणि उपाय योजना करणे गरजेचे आहे. सरकार दावा करते की, भारतातील कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी नवीन कामगार कायदे केले आहेत. यात वेतन संहितेमध्ये सर्व कामगारांना वेळेवर पगार आणि किमान वेतनाची हमी दिली आहे. ज्यामुळे विषमता कमी होईल असा दावा केला जातो आहे. परंतु, एकीकडे कंत्राटी पद्धतीचा पुरस्कार करायचा आणि दुसरीकडे विषमता कमी होईल असे म्हणायचे आणि एकीकडे कामगारच कंत्राटी पद्धतीने संपवायचा तर हे कायदे करून याचा कोणाला फायदा द्यायचा आहे हे न समजण्यासारखे गणित आहे. समाजिक सुरक्षा संहिता ही असंघटीत क्षेत्रातील कामगार गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना, स्विगी, झोमॅटो कर्मचारी, विमा, पेन्शन आणि भविष्यातील निधीसारखे लाभ मिळतील असा दावा केला जातो. तर दुसरीकडे संघटित कामगारांना मात्र एन. पी. एस. योजना मागू करायची हा विरोधाभास आहे. बँकांमधील सुरक्षा कर्मचारी नेमणूक जवळपास बंदच झाली आहे. कारण काय तर सुरक्षेवर ज्यादा खर्च होतो. जर बँकेत दरोडा पडला आणि जीवितहानी आणि बँकेची वित्तहानी झाली तर याची भरपाई कोण करेल, याचे उत्तर कोणाकडेच नाही. औद्योगिक संबंध संहिता कामगार संघटनांना बळकट करणे आणि नोकरीत स्थिरता वाढविणे असा दावा केला जातो. परंतु वास्तविकता ही वेगळी आहे. आता संघटना स्थापण्यासाठी बरेच निकष लावले आहेत. संप करण्याचा जो अधिकार आहे, त्यावर गदा आणण्यात आली आहे. असे निकष आणले आहेत की, कामगार संपच करू शकणार नाही.

जास्तीच्या वेळात काम केल्यास दुप्पट वेतन मिळविण्याचा अधिकार येण्याचा दावा केला जात आहे. वास्तविकतः ओव्हर टाईमचा कायदा अगोदरचाच आहे. संघटित कामगारांना सुद्धा ओव्हरटाईमचा कायदा असूनसुद्धा ओव्हरटाईम देण्याची चालढकल केली जाते. ही वास्तविकता आहे. महिला कामगारांना रात्रीपाळीची काम न देण्याची गरज आहे. तसेच अनिवार्य आरोग्य तपासणी आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता असणे गरजेचे आहे. मालकाची, भांडवदारांची आणि सरकारची कामगारांकडे बघण्याची अनास्था हा मोठा गंभीरतेचा विषय आहे. जोपर्यंत यात सुधारणा होणार नाही, तोपर्यंत कामगारांचे जीवनमान सुधारू शकत नाही.

संगणीकरणाच्या माध्यामातून एक मोठे आव्हान आपण स्वीकारले, यात आपण बरंच नाही म्हटले तरी रोजगार गमावलेला आहे. यात मानवाचे जे विविध कौशल्य होते ते संपुष्टात आले आहेत. संगणीकरणापर्यंत ठीक होते. नफा कमविणे तेही ठीक आहे. परंतु आता मोठे आव्हान समोर येत आहे ते म्हणजे ए.आय. (आर्टीफिसिअल इंटेलिजन्स) कृत्रिम बुद्धिमत्ता. आता ही ए.आय. मानव जसा विचार करतो तसा विचार करणार आहे. एकवेळ आपल्या कौशल्यावर बाधा आणली ते आपण समजू शकतो. परंतु, आपल्या विचारावर बाधा आणणे म्हणजे, कामगारांसाठी मोठे आव्हान आहे. कामगाराच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. कामगाराच्या सुदिनासाठी एकमेव मूलमंत्र आहे. तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' तरच भविष्यात कामगारांचे सुगीचे दिवस येतील, नाहीतर सध्या जसे शोषण चालू आहे तसेच राहील. कामगार संपत्ती निर्माण करतो, त्याने त्याचे रोजगाराचे दाम ठरविणे ही काळजी गरज आहे. ज्या दिवशी कामगार त्याच्या कामाचे मोल ठरवेल तो कामगारांसाठी सुदिन असेल.

कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## वळणे येथे गुटखा तस्करीचा पर्दाफाश

**रत्नागिरी :** दापोली शहरानजीक वळणे येथे दापोली पोलिसांनी गुटखा तस्करीचा मोठा पर्दाफाश केला. या कारवाईत विक्रीसाठी बेकायदेशीररित्या वाहतूक करण्यात येत असलेला गुटखा जप्त करण्यात आला असून इर्टिगा कारसह सुमारे ७ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी ताब्यात घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार यादव हे आपल्या पथकासह दापोली-दाभोळ मार्गावर नियमित पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी वळणे परिसरात रस्त्याच्या कडेला संशयास्पद स्थितीत उभी असलेली इर्टिगा कार त्यांच्या निदर्शनास आली. वाहनाच्या काचांवर पडदे लावलेले असल्याने संशय अधिक बळावला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता गाडीत बॉक्सच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात गुटखा साठवलेला आढळून आला. प्राथमिक चौकशीत हा गुटखा अनधिकृतरित्या विक्रीसाठी वाहतूक केला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.



## शोभा खांडेकरांना पुरस्कार प्रदान

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील राजिप शाळा धानकान्हे आदिवासीवाडी येथील उच्च शिक्षित व होतकरू शिक्षिका शोभा अलंकार खांडेकर यांना विनोबा ॲप ओपन लिंक फाउंडेशनमार्फत दिला जाणारा यंदाचा स्पर्धा प्रमाण या विषयातील रायगड जिल्हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांना सोमवारी (दि.२७) रायगड जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी दहितूले यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थित देऊन गौरविण्यात आले. शोभा खांडेकर यांना रायगड जिल्ह्यातील टॉप पाच शिक्षकांमधून हा पुरस्कार देण्यात आला आहे. त्या सन २०२४ मध्ये शिक्षण सेवेत भरती झाल्यानंतर त्यांनी अल्पवधीत कालावधीत शिक्षण सेवेत घेतलेली उंच भरारी आणि गोरगरीब आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून दिले जाणारे मोलाचे शिक्षण त्याचबरोबर विविध सामाजिक संस्थामधून देत आलेले सामाजिक योगदान याची खरी पोच पावती या पुरस्काराने मिळाली आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात आले आहे.

## भंगार दुकानाच्या आडून अमली पदार्थांची विक्री



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील नेरूळ परिसरात भंगार व्यवसायाचा मुखवटा घालून अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश झाला आहे. यावर नवी मुंबई महानगरपालिकेने गुरुवारी (दि.३०) मोठी कारवाई केली आहे. नेरूळ सेक्टर २८ आणि सीवूड्स रेल्वे स्थानक परिसरात सुरू असलेल्या या बेकायदेशीर व्यवसायाचे पाळेमुळे खणून काढत पालिकेच्या पथकाने हे अनधिकृत दुकान जमीनदोस्त केले.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार राजू राठोड हा सध्या अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल असलेल्या दोन गुन्ह्यांखाली कारागृहात आहे. मात्र, त्याच्या पश्चात त्याची पत्नी त्याच भंगार दुकानाच्या आडून अमली पदार्थांचा व्यवहार चालवत असल्याची माहिती समोर आली होती. या संदर्भात सातत्याने तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. महापालिकेने पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून अखेर या अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई केली. मनपाच्या अतिक्रमण विरोधी पथकाने या कारवाई दरम्यान दुकानातील सर्व भंगार साहित्य जप्त केले आहे. या धडक कारवाईमुळे नेरूळ आणि सीवूड्स परिसरात बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या धंद्यांना जरब बसणार आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या अशा संशयास्पद व्यवसायांवर यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## निवडक

### नाचणे येथे केंद्रीय विद्यालय होणार

**मुंबई :** रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे येथे नवीन केंद्रीय विद्यालय स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या नवीन विद्यालयासाठी अडीच हेक्टर जमीन देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे कोकणातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी आणखी एक महत्वाची सुविधा उपलब्ध होणार आहे. केंद्र सरकारने देशात ८५ नवीन केंद्रीय विद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील अकोला आणि रत्नागिरीचा समावेश आहे. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे (म्यु.आत, ता. जि. रत्नागिरी) येथे भारत सरकारच्या केंद्रीय विद्यालय संघटन यांच्या माध्यमातून नवीन केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी या जागेची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार नाचणे म्यु.आत येथील सर्व्हे क्रमांक ९३ मधील अडीच हेक्टर जमीन केंद्रीय विद्यालय संगठनास वर्ग दोन धारणाधिकाराने देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे भविष्यात रत्नागिरी जिल्हयात केंद्रीय स्तरावरील आणि राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाशी सुसंगत अशी शिक्षण सुविधा या केंद्रीय विद्यालयाच्या स्थापनेमुळे उपलब्ध होणार आहे.



### खारेगाव खाडीपूल वाहतुकीसाठी खुला

**ठाणे :** मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा खारेगाव खाडीवरील नवा उड्डाणपूल अखेर वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. बुधवार, २९ एप्रिलपासून या पुलावरून वाहनांची वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे या महामार्गावर अरुंद खाडीपुलाच्या दोन्ही दिशेकडील मार्गिकेवर होणारी वाहतूक कोंडी फुटली असून ठाण्याहून नाशिककडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही वर्षांत मुंबई-नाशिक मार्गावरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला होता. औद्योगिक वसाहती, वाढती नागरी वस्ती तसेच समृद्धी महामार्गशी झालेली जोडणी यामुळे या मार्गावर वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. परिणामी खारेगाव खाडी परिसर, साकेत पूल आणि टोलनाका भागात दररोज वाहतूककोंडी होत होती. मात्र, नवा खाडीपूल सुरु झाल्याने मुंबई, ठाणे, मुंब्रा, कळवा, भिवंडी, कल्याण नाशिकच्या दिशेने व समृद्धी महामार्गाने मुंबई, ठाणे शहराकडे येणाऱ्या वाहनांना कोंडीतून दिलासा मिळणार आहे.

### 'सुविधा सक्षमीकरणावर भर द्यावा'

**मुंबई :** राज्यातील पर्यटन क्षेत्र अधिक सक्षम, परिणामकारक आणि पर्यटकाभिमुख करण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा बळकटीकरण, सेवांचा दर्जा उंचावणे आणि पर्यटन उपक्रमांना गती देण्यावर भर देण्यात यावा, अशा सूचना पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या. मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली तथा राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ संचालक मंडळाची १७७ वी सर्वसाधारण बैठक सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीत पर्यटन महामंडळाच्या एकूण कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच, राज्यातील पर्यटन विकासाशी संबंधित विविध धोरणात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. पर्यटन क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याबरोबरच सेवांची गुणवत्ता उंचावणे, पर्यटकांना अधिक दर्जेदार व सक्षम सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच पर्यटन प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक दिशानिर्देश यावेळी देण्यात आले. बैठकीत मंत्री देसाई यांनी पर्यटन विकासाशी संबंधित प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना देत महामंडळाचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यावर भर दिला. राज्यातील पर्यटन स्थळांचा दर्जा उंचावणे, सुविधा विस्तार, स्वच्छता, सेवा व्यवस्थापन आणि पर्यटकाभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. तसेच पर्यटन क्षेत्रातील गुंतवणूक, स्थानिक सहभाग, रोजगारनिर्मिती आणि शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विभागीय स्तरावर समन्वय वाढवून नियोजनबद्ध कामकाज करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनीही राज्यातील पर्यटन क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सकारात्मक व कटिबद्ध असून, पर्यटन वाढीस चालना देणाऱ्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत असल्याचे नमूद केले.

## महाराष्ट्र एआय धोरण जाहीर

- दहा हजार कोटींची गुंतवणूक
- दीड लाख रोजगाराच्या संधी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर वाढविण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत 'महाराष्ट्र एआय धोरण-२०२६' जाहीर करण्यात आले.

'इंडिया एआय मिशन'च्या धर्तीवर राबविण्यात येणाऱ्या या धोरणाच्या माध्यमातून संशोधन, नवोपक्रम आणि जबाबदार प्रशासन यांना चालना देण्यात येणार आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार आहे, त्यामुळे या धोरणात वेळेनुसार काळानुरूप बदल करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. २०३१ पर्यंत दहा हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि दीड लाखांहून अधिक रोजगार निर्माण करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

जागतिक पातळीवर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अनेक देशांची स्पर्धा सुरु असताना महाराष्ट्राने नैतिक व सर्वसमावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाचे राष्ट्रीय केंद्र ही आपली ओळख निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी महाराष्ट्र एआय मिशन स्थापन करण्याचा प्रस्ताव या धोरणात मांडण्यात आला आहे. राज्यातील दोन लाख युवक व व्यावसायिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजनाही यात अंतर्भूत आहे.

नैतिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात महाराष्ट्राने इंडिया एआय मिशनसाठी संदर्भ राज्य म्हणून ओळख मिळवावी हाच या धोरणाचा आत्मा आहे. लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) एआय क्षेत्रात आणण्यासाठी धोरणात विशेष तरतूद आहे. पाच हजार एमएसएमई ना एआय अंमलबजावणी खर्चावर २० टक्के अनुदान दिले जाणार असून महा एआय टूल्स हब हे केंद्रीय व्यासपीठ स्थापन केले जाणार आहे. स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा समर्पित एआय स्टार्टअप व्हेंचर फंड उभारण्यात येणार आहे.

### गुंतवणूकदारांसाठी अनेक सवलती

उद्योगांना आकर्षित करण्यासाठी धोरणात भरीव आर्थिक सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. स्थिर भांडवली गुंतवणुकीवर कमाल २० टक्के भांडवली अनुदान, १०० टक्के मुद्रांक शुल्कमाफी, दहा वर्षांपर्यंत प्रति युनिट दोन रुपये वीज दर अनुदान, देशांतर्गत पेटंटसाठी आठ लाख व आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी दहा लाख रुपयांपर्यंत खर्च परतावा आणि २५ लाखांपर्यंत प्रमाणन खर्च परतावा, अशा सवलती यात अंतर्भूत आहेत. आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभागी होणाऱ्या उद्योगांना २५ लाखांपर्यंत भाडे परतावाही दिला जाणार आहे. यामुळे महाराष्ट्राचे एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाऊल टाकले जाणार आहे.

## हापूसच्या नावाखाली मद्रासच्या आंब्याची विक्री

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



कोकणातील हापूस आंब्याचा हंगाम सध्या जोरात असून, याच संधीचा फायदा घेत काही व्यापारी ग्राहकांची मोठी फसवणूक करत असल्याचे समोर येत आहे.

अनेक ठिकाणी परराज्यातील, विशेषतः मद्रासचा आंबा रत्नागिरी हापूस असल्याचे सांगून विकले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर, तालुका कृषी अधिकारी तसेच पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांनी स्वतः बाजारपेठेत फिरून प्रत्यक्ष वस्तूस्थितीची खातरजमा करावी, अशी मागणी मुकादम यांनी केली आहे. यामुळे नेमका कोणता आंबा हापूस आहे आणि कोणता परराज्यातील, हे स्पष्ट होण्यास मदत होईल. ग्राहकांची दिशाभूल करून मद्रासचा आंबा हापूस म्हणून विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर प्रशासनाने तातडीने कडक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या फसवणुकीमुळे कोकणातील अस्सल हापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. तर ग्राहकांनाही निकृष्ट दर्जाचा आंबा चढ्या दराने विकला जात असून त्यांचीदेखील फसवणूक होत आहे.

**हरित महाराष्ट्र आयोग स्थापनेला मान्यता** | **२७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता**

# राज्यात ३०० कोटी वृक्षांची होणार लागवड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



राज्यात तिनशे कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्याने २०४७ पर्यंत ३०० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट्य ठेवले असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे.

आयोगाच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री असतील, तर उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष, वन मंत्री, पर्यावरण व हवामान बदल मंत्री, कृषी मंत्री आणि रोजगार हमी योजना मंत्री सहउपाध्यक्ष असतील.

राष्ट्रीय वनधोरण १९८८ अनुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित किंवा वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. राज्यात वनाच्छादित आणि वृक्षाच्छादित क्षेत्र अनुक्रमे १६.५३ व ४.७२ टक्के आहे. त्यामुळे एकूण क्षेत्र २१.२५ टक्के होत असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी राज्याने दीर्घ नियोजन केले आहे.

त्यासाठी ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, सनियंत्रण आणि वित्त पुरवठ्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वृक्षलागवडीसाठी जागेची उपलब्धता आणि लँड बँक निर्मितीवर भर दिला जाईल. सध्या २९ हजार चौरस किलोमीटर जमीन उपलब्ध आहे. ३०० कोटी वृक्षलागवडीसाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.

### आयोगाकडून नियोजन, अंमलबजावणी होणार

सद्या विविध विभागांमार्फत सुरू असलेले वृक्षारोपण कार्यक्रम आणि अभियानाची एकात्मिक पद्धतीने अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे. राज्यात ३०० कोटी वृक्षलागवडीकरिता महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम, पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी हरित महाराष्ट्र आयोग काम करणार आहे.

### जिल्हानिहाय लँड बँक

राज्यातील वनाच्छादित, वृक्षाच्छादित तसेच गवताळ प्रदेशांचा गुणात्मक व परिणामात्मक विस्तार साध्य करणे, हवामान बदलास प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे, जलसंधारण सुधारणे, जमिनीचा पोत सुधारणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीस चालना देणे तसेच स्थानिक नैसर्गिक परिसंस्थांचे जतन क्षेत्रनिहाय पर्यावरणपूरक दृष्टीकोनातून वृक्षलागवड करणे यावर भर दिला जाणार आहे. जिल्हानिहाय लँड बँक विकसित केल्या जाणार आहेत. त्यामध्ये वन विभाग, मनरेगा व अन्य विभागांशी समन्वय साधून जमीन उपलब्ध करून घेणार आहे.

## नि|व|ड|क

### डॉ. गौरीचे वैद्यकीय क्षेत्रात यश

**तळा :** रायगड जिल्ह्यातील तळा येथील डॉ. गौरी उदय काळबेरे यांनी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या गावाचे व परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांनी अलीकडेच नेफ्रोलॉजी (मूत्रपिंड रोग तज्ज्ञ) या विषयात उच्च पदवी यशस्वीरित्या संपादन केली असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. डॉ. काळबेरे यांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तळा परिसरात पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी २०१४ साली अहमदनगर येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन मेडिकल कॉलेज अ‍ॅण्ड हॉस्पिटलमधून एमबीबीएस पदवी प्राप्त केली. पुढे त्यांनी २०१९ साली नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन, नवी दिल्लीमार्फत जनरल मेडिसिनमध्ये पदवी संपादन केली. यानंतर त्यांनी उच्च शिक्षणासाठी प्रयत्न सुरू ठेवत २०२५ साली मेदांता द-मेडिसिटी, नवी दिल्ली येथून नेफ्रोलॉजी या विशेष शाखेत पदवी मिळवली. त्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, मेहनत आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन हे महत्त्वाचे घटक असल्याचे सांगितले जाते. ग्रामीण भागातून येऊनही त्यांनी राष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षण मिळवून आपल्या कर्तृत्वाची छाप पाडली आहे.डॉ. गौरी काळबेरे या भविष्यात मूत्रपिंड विकारांवर विशेष उपचार सेवा देण्याचा मानस व्यक्त करत आहेत. ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.




### झाप ठरतात वाहनचालकांची डोकेदुखी



**कोर्लई :** एप्रिल महिना संपून-मे महिना सुरु होत असताना मुरुड जंजिरा पर्यटनात पर्यटकांचा वाढत आहे. परंतु शहरातील रस्त्यालगत, समुद्रकिनारी रस्त्यालगत, रस्त्यावर आलेल्या नारळ झाडांवरील झालेली नारळे व झाप पडण्याचा संभाव्य धोका ओळखून नारळ व झाप काढण्यात यावेत तसेच याबाबत उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मुरुड समुद्रकिनाऱ्यावर सध्या पर्यटकांची वर्दळ हळूहळू सुरू होत आहे, त्याचबरोबर समुद्रकिनाऱ्यावरती फिरणाऱ्यांची संख्या जास्त असते. शहरातील काही रस्त्यालगत तसेच समुद्रकिनाऱ्यावर समुद्राच्या बाजूस रस्त्यावर अनेक माडाची झाडे झुकलेली हेत. रस्त्यावरुन जाताना सर्व माडाची झाडे बरोबर डोक्यावर नारळ झाडाचा पसारा घेवून आहेत. अनेक झाप व नारळ रस्त्यामध्ये पडतात. यामुळे वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. मुरुड नगरपरिषदेने रस्त्यावर आलेले माड झाडांचे मालकांना नारळाचे झाडे साफ करून त्यावरील झाप, व नारळ काढून घेण्यासंबंधी सुचना देऊन योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### रंजना पाटील सेवानिवृत्त



**खरोशी :** ज्ञानादानाची अखंड साधना करत, विद्यार्थ्याच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या, गौरवशाली व समर्पित सेवापूर्तीने आयुष्यभर ज्ञानाची ज्योत प्रज्वलित ठेवणाऱ्या,असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या आमडोशी रोहा येथील केंद्रप्रमुख रंजना गुरुनाथ पाटील सेवा निवृत्त झाल्या आहेत. २८ फेब्रुवारी १९८९ ते ३० एप्रिल २०२६ या ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवा त्यांनी केली. त्यांच्या या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित समारंभास त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पेण येथील आगरी समाज विकास सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी सत्कारमुर्ती रंजना पाटील सेवानिवृत्त शिक्षक प्रभाकर नाईक, प्रतिभा नाईक, अमरचंद पाटील, प्रमोद पाटील, कर्जत गटशिक्षणाधिकारी प्रमोद पुरी, रविकांत ठाकूर, धनाजी घरत, गुरूनाथ पाटील, प्रदिप म्हात्रे, दत्तात्रेय नांदेडकर, प्रणय नाईक, शुभम पाटील, श्रेयस पाटील, सुशील पाटील, अशोक पाटील, रमेश पाटील, भावना पाटील, श्वेता पाटील, वावेघर रोडे शाळेतील शिक्षक व विद्यार्थी आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश थवई यांनी केले होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **Job vacancies available**. For office staff. Graduates can call for interview. Please call 9923750549
- **Jai santoshi maa** CNG station alibag, wadgav, 1) fillerman, 2) supervisor,3) House-keeping. Contact Number- Subham Naik 7774039128, Rohit Pongade-749813181
- **वधू पाहिजे-** केंद्रीय सरकारी अधिकारी वय ४० ते ५०, निमगोरी शिक्षण-ग्रज्युकेशन , जात -हिंदु. उत्पन्न- २०००००० वार्षिक, फोन - ७३८५६६४०७९.
- **भारतीय उद्योजकता विकास संस्था** (EDII) अहमदाबाद यांना अलिबाग येथे मध्यवर्ती ठिकाणी कार्यालयाकरीता जागा पाहिजे. तसेच ग्राफीक्स डिझायनर पाहिजे. संपर्क - ७७७५८०२५९७
- **सर्वप्रकारचे आजार (लठ्ठपणा/संतानप्राप्ती/मधुमेह/कॅन्सर इ)** विवाह १८-१००, गुंतवणूकीवर दरमहा १८% सोनेतारणावर बिनव्याजी कर्ज घरबसल्या लाखो कमविणेसाठी प्रत्येक वस्तूवर ५०% सुट होमव्हिजीट उपलब्ध वेळ ठरवूनच डॉ. नथुराम शिहू, भैरवनाथ मंदिराजवळ (नागोठणे-पोयनाड रोड) रायगड ४०२१०६, मोबा. ७५०७१६६०१५/ ७०२००८५२०९/९४२२१४८२०३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# ओव्हरलोड डंपरमुळे नागरिक त्रस्त

- प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जीविताला धोका
- स्थानिक नागरिकांना चालणेही झाले कठीण

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात अवजड आणि ओव्हरलोड डंपरने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. कधी रस्त्यावर सांडणारी खडी आणि उडणारा धुरळा, तर कधी बेभान वेगामुळे होणारे अपघातामुळे स्थानिक नागरिक, भाविक आणि व्यापारी मेटाकुटीला आले आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पालीकरांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला असून संतापाची लाट उसळली आहे.

रविवारी (दि. २६) मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या एका डंपरमधून मोठ्या प्रमाणावर बारीक खडीचा भुगा (ग्रीट) सांडत होता. यामुळे संपूर्ण परिसरात धुळीचे लोट उसळले होते. ज्यामुळे पादचारी आणि दुचाकीस्वारांना धुळीने आंघोळ करण्याची वेळ आली. समाज माध्यमांवर हा व्हिडिओ देखील मोठ्या प्रमाणावर फिरत होता. गेल्या आठवड्यात ग. बा. वडेर हायस्कूलजवळही अशीच घटना घडली होती. रस्त्यावर सांडलेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून, शाळकरी विद्यार्थ्यांना चालणेही कठीण झाले आहे.

केवळ धूळच नव्हे, तर डंपरच्या बेजबाबदार वाहतुकीमुळे अपघातांचे सत्र सुरूच आहे.

सोमवारी रात्री एका बेभान डंपरने आगरआळी जवळ उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. सुदैवाने त्या ठिकाणी कोणीही नसल्याने मोठी जीवितहानी टळली. यापूर्वी जानेवारीत ग्रामविकास अधिकारी सचिन केंद्रे आणि फेब्रुवारीत महावितरणचे कर्मचारी अनंत सोनवणे हे देखील डंपरमुळे झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाले होते.




### प्रशासकीय अनास्था

पाली नगरपंचायतीने २६ फेब्रुवारी रोजी शहरातून सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहतूक बंद करण्याचा ठराव मंजूर केला होता. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुढील कार्यवाही न झाल्याने हा ठराव केवळ कागदावरच राहिला आहे. त्यातच गेल्या १५ वर्षांपासून रखडलेला मबायपासफ मार्ग पूर्ण न झाल्याने सर्व अवजड वाहतूक शहराच्या अरुंद रस्त्यावरून सुरू आहे.

> “या ओव्हरलोड डंपर वाहतुकीमुळे शाळकरी विद्यार्थी, पालक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. अवजड वाहतूक थांबावी यासाठी नगरपंचायतीला निवेदन दिले होते, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाने ही ओव्हरलोड वाहतूक तातडीने बंद करावी, अन्यथा सामान्य पालीकर रस्त्यावर उतरतील.
> – श्रीकांत ठोंबरे,”

## देवपाडा शाळेतील मुलांना सायकल वाटप

- विद्यार्थ्यांना करावी लागत होती पायपीट
- विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटले हसू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक आणि शेती क्षेत्रात कार्य करणाऱ्या मुंबई येथील युनायटेड वे या संस्थेकडून देवपाडा शाळेतील विद्यार्थ्यींना सायकली वाटप करण्यात आल्या. देवपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या चिंचवाडी, वाघाचीवाडी, उंबरवाडी आणि देवपाडा गावातील विद्यार्थिनी यांना या सायकली वाटप करण्यात आल्या. दरम्यान, ७१ विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्याच्या कार्यक्रमानंतर आदिवासी विद्यार्थिनी यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले आणि युनायटेड वे चे पदाधिकारी देखील समाधानी झाल्याचे दिसून आले.




तालुक्यातील देवपाडा या मोठ्या लोकवस्तीच्या गावात आठवीपर्यंत जिल्हा परिषद शाळा असून या शाळेत परिसरातील चार आदिवासी वाड्यांमधील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असतात. ही बाब लक्षात घेऊन या शाळेचे शिक्षक देसाई यांच्या माध्यमातून युनायटेड वे या संस्थेचे विद्यार्थ्यांची पायपीट कमी करण्यासाठी सायकल भेट देण्याचे निश्चित केले. त्यानुसार शाळेत शिकणाऱ्या तब्बल ७१ विद्यार्थिनी यांना सायकली भेट देण्याचा कार्यक्रम शाळेच्या आवारात पार पडला. यावेळी कर्जत तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, खंडू मंजुळे, रतन पाईकराव, केंद्रप्रमुख म्हात्रे, शाळेचे मुख्याध्यापक दरवडा, सीमा जाधव, आणि शिक्षक वर्ग उपस्थित होता.

युनायटेड वे या संस्थेचा सामाजिक दायित्वाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून त्या भागातील आदिवासी मुलांना शाळेत येण्यासाठी पायपीट करून यावे लागत होते. देवपाडा येथील जिल्हा परिषद शाळा ही एका खोलगट भागात असून त्या गावच्या एका बाजूला असलेल्या टेकडीवर उंबरवाडी तसेच अन्य वाड्या आहेत.

तर दुसऱ्या बाजूला असलेल्या टेकडीवर वाघाची वाडी, चिंचवडी या आदिवासी वाड्या असून या दोन्ही भागातून जिल्हा परिषद शाळेत येणारे विद्यार्थी यांना एकदा डोंगर उतरून शाळेत यावे लागते आणि घरी परतत असताना डोंगर चढून घरी जावे लागते. ही बाब युनायटेड वे या संस्थेच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी तत्काळ या प्रकल्पाला मान्यता दिली. या शाळेतील तब्बल ७१ विद्यार्थ्यांना सायकली वाटप केल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होते.

## तळोजा औद्योगिक वसाहतीच्या विकासाला गती

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

तळोजा औद्योगिक वसाहतीच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून विविध पायाभूत सुविधा आणि औद्योगिक प्रकल्प हाती घेण्यात आले असून, परिसराच्या औद्योगिक प्रगतीला आता अधिक वेग मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. एम आई डी सी मार्फत तळोजा औद्योगिक क्षेत्रात सुमारे २०० कोटी रुपयांच्या निधीतून रस्ते दुरुस्ती, रुंदीकरण, ड्रेनेज व्यवस्था सुधारणा तसेच स्टॉर्म वॉटर लाईन उभारणीची कामे सुरू आहेत. या कामांमुळे औद्योगिक वाहतुकीतील अडथळे कमी होऊन लॉजिस्टिक्स व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

तसेच, तळोजा परिसरात भविष्यात मोठ्या प्रमाणावर डेटा सेंटर पार्क उभारण्याची योजना असून, यामुळे आयटी व डिजिटल क्षेत्रातील गुंतवणूक वाढून स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

दरम्यान, तळोजा परिसरात खासगी स्तरावर लॉजिस्टिक्स व वेअरहाउसिंग प्रकल्प विकसित होत असून, जवाहरलाल नेहरू बंदर, नवी मुंबई मेट्रो आणि महामार्गांच्या जवळीकतेमुळे हा परिसर लॉजिस्टिक हब म्हणून वेगाने विकसित होत आहे.

कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने मोरबे-कलंबोली मार्गाच्या उभारणीमुळे औद्योगिक वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार असून, नवी मुंबई मेट्रो प्रकल्पामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

## जनगणनेच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयात प्रशिक्षण



**नवीन पनवेल :** भारत सरकारच्या आगामी जनगणना २०२७ या राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे, उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसीलदार पनवेल मीनल भोसले भामरे तसेच अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना २०२७ साठी नियोजनबद्ध कार्यवाही सुरू असून, सुमारे १८०० प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण पार पाडण्यात येत आहे. या अनुषंगाने प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण २३ एप्रिल ते ८ मे या कालावधीत सिकेटी ज्युनिअर कॉलेज, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे.

## जे.एस.एस.रायगडचा कौशल्य दीक्षांत सोहळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड महाराष्ट्र यांच्या माध्यमातून १ मे कामगार दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात कौशल्य विकासातील अनोखा उपक्रम बुधवारी (दि.३०) एप्रिल रोजी मुख्य कार्यालय सहाण-अलिबाग या ठिकाणी कौशल्य दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

समाजातील तळागाळातील निरक्षर, अपूर्ण खंडित शिक्षण झालेल्या व जे.एस.एस.रायगडच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.



दुर्लक्षित प्रशिक्षणनार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाची प्रेरणा जागृत व्हावी, शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळावे, तसेच उच्च पदवी प्राप्ती वातावरण निर्मितीचे स्वरूप त्यांना कळावे या उद्देशाने सदर समारंभाचे स्वरूप दीक्षांत समारंभा सारखे करण्यात आले होते. शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत जे. एस. एस. रायगडचा कौशल्य दीक्षांत सोहळा हा अनोखा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. जन शिक्षण संस्थान योजनेच्या माध्यमातून जनसामान्यांचा सन्मान होत असल्याचे डॉ. मेधा सोमैया यांनी व्यक्त केले. तर जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी सदर व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे डॉ. नितीन गांधी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. विजय हिरामण कोकणे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रतिक्षा चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी रुईया कॉलेज रसायनशास्त्र विभागाच्या असोसिएट प्रोफेसर डॉ. विद्या दिघे जी, विलास दिघे जी, डॉ. नितीन गांधी, डॉ. विजय कोकणे, नरेन जाधव, संजय राऊत, प्रतिक्षा चव्हाण, कल्पना म्हात्रे, अक्षता जामकर, रेखा घरत, कविता म्हात्रे, श्रेया पाटील तसेच कर्मचारी व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## आदिवासी विक्रेत्यांसाठी ‘स्वतंत्र बाजार’ची मागणी

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी।**

शहरातील भूमिपुत्र आदिवासी विक्रेत्यांना सन्मानाने व्यवसाय करता यावा यासाठी स्वतंत्र आदिवासी हक्काचा बाजार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मनसे पनवेल शहर शाखेने पनवेल महानगरपालिकेच्या उपआयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी पराग बालड, रोहन पाटील उपस्थित होते.



जंगलातून मिळणाऱ्या रानभाज्या, फळे, औषधी वनस्पती व इतर नैसर्गिक उत्पादने विकून अनेक आदिवासी कुटुंबे आपला उदरनिर्वाह करतात. मात्र, शहरातील रस्त्यांवर विक्री करणाऱ्या या विक्रेत्यांवर भविष्यात कारवाई होण्याची शक्यता असल्याने त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

आदिवासी समाजाला केवळ अनुदान नव्हे, तर सन्मानाने जगण्यासाठी स्थिर आणि अधिकृत बाजारपेठेची गरज आहे. त्यांच्या पारंपरिक कौशल्यांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात.

यासाठी मनसेने काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये शहरातील मोकळ्या जागेत किंवा महापालिकेच्या बाजारपेठांमध्ये स्वतंत्र आदिवासी बाजार झोन घोषित करणे, पावसाळ्यातील हंगामी रानभाज्या विक्रीसाठी बसस्थानक परिसरात तात्पुरते स्टॉल्स उपलब्ध करून देणे, तसेच आदिवासी विक्रेत्यांची नोंदणी करून त्यांना अधिकृत ओळखपत्रे देणे यांचा समावेश आहे. तसेच, आदिवासींकडून विक्री होणारी उत्पादने सेंद्रिय असल्याने त्यांना विशेष प्रोत्साहन देऊन शहरातील नागरिकांना आरोग्यदायी अन्न उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला आहे.

## खारघर आरोग्य केंद्रात अव्यवस्था

**नवीन पनवेल :** खारघर परिसरातील एका आरोग्य केंद्रामध्ये अस्वच्छता आणि अव्यवस्थेचा प्रकार समोर आल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्वच्छतागृहाजवळ औषध ठेवल्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खारघर सेक्टर १२ येथील आरोग्यवर्धिनी केंद्रातील आपला दवाखान्यात महालॅबच्या माध्यमातून विविध प्रकारच्या तपासण्या मोफत केल्या जातात. आरोग्य केंद्र हे स्वच्छ आणि सुरक्षित असणे अत्यंत गरजेचे असताना येथे मूलभूत स्वच्छतेच्या नियमांचे पालन होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओमध्ये व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये स्वच्छतागृहाजवळ औषध ठेवल्याचे दिसून येते. यामुळे संसर्गाचा धोका वाढू शकतो तसेच औषधांची गुणवत्तादेखील बाधित होण्याची शक्यता आहे.

**डम्पिंग ग्राऊंडबाबत अक्षम्य उदासिनता | नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे दूर्लक्ष**

# पोलादपूरमध्ये कचरा प्रश्न पेटला

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर नगरपंचायतीने डम्पिंग ग्राऊंडबाबत गेल्या ९ वर्षांपासून अक्षम्य उदासिनता दाखविल्यामुळे आधी पोलादपूर स्मशानभूमीलगत आणि आता महाबळेश्वर रस्त्यालगतच्या चोळई सावित्री संगमावरील डम्पिंग ग्राऊंड तयार झाले आहे. त्यामुळे मोकाट गायी-गुरे यांच्या पोटात प्लास्टीकचा कचरा जाऊन पोटं मोठी झाली आहेत तर पावसाळयात हा कचरा थेट सावित्री नदीपात्रामध्ये मिसळला जाऊन नदीपात्रातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांतून प्रदुषित पाणीपुरवठा नळाद्वारे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याविरोधात ठोस पाऊले उचलण्याऐवजी नगरपंचायत प्रशासनाने स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये सहभागी होऊन भिंती रंगवून नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे सपशेल दूर्लक्ष केले आहे. याविरोधात, दि.१५ एप्रिल रोजी संस्थापक राज पार्टे यांच्या मआमची माती आमची माणसंफ संघटनेने छ.शिवाजी महाराजांचा पुतळा या डम्पिंग ग्राऊंडवर उभारण्याचे अभिनव आंदोलन हाती घेतले. यावेळी काही नगरसेवक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी या आंदोलनामध्ये टोकाची भूमिका नको, असे सांगून छ.शिवाजी महाराजांचा पुतळा या डम्पिंग ग्राऊंडवर उभारण्यास परावृत्त केले.


● (छायाचित्र : शैलेश पालकर)

मात्र, यानंतर राज पार्टे यांनी कचरा गाडी घेऊन नगरपंचायतीच्या प्रांगणात ‘आमची माती आमची माणसं’ संघटनेच्या सभासदांसह जाऊन कचराप्रश्नी सत्ताधारी उपनगराध्यक्ष व प्रशासनाचे लक्ष वेधले. यानंतर दोन आठवडे उलटूनदेखील नगरपंचायतीने कोणत्याही प्रकारचे गांभिर्याने पाऊल उचलले नाही.

यामुळे पोलादपूरकरांच्या भावना तीव्र झाल्या असून नगरपंचायतीकडून कचराप्रश्नी होणाऱ्या दूर्लक्षामुळे गाई-गुरे, पाळीव प्राणी यांच्यासह नदीपात्रालगत भाजीफळे, बकऱ्याकोंबडयांचे अवशेष आदी जैवकचरा आणि प्लास्टीक पिशव्यांसह धातू आणि सांडपाणीसदृश्य ओला कचरा मोठया प्रमाणात टाकला जात असल्याचे सातत्यही कायम राहिले आहे.

पोलादपूर नगरपंचायतीने वर्षाला ७९ लाख रूपयांची निविदा कचरा उचलून विल्हेवाट लावण्याकामी ठेकेदाराला दिल्यानंतरही सफाई कामगारांची संख्या कमी असतानाही जास्त संख्या दाखवून रोजमजूरीवर डल्ला मारणे तसेच कचऱ्यातील प्लास्टीकच्या वस्तू तसेच तांबे, पितळ, स्टील आदी धातूंच्या वस्तूंना चरई फाटयाजवळील भंगारविक्रेत्याकडे कचरा गाडी उभी करून रितसर वजनकाटयावर पिशव्या ठेऊन वजन करून कचऱ्यातून भंगारविक्रीचाही प्रकल्प राबविण्यात आला असल्याचे फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाले आहेत.

### संघटना विचारणार जाब

प्रशासनावर कचरा ठेकेदार आणि कचराप्रवण क्षेत्रासंदर्भात कोणतेही नियंत्रण नसल्याचे उघड झाल्याने आजच्या आंदोलना प्रसंगी पोलादपूरकर जनतेसह आमची माती आमची माणसं संघटनेकडून जाब विचारण्यात येणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मनिषा संदीप नाईक, २) अनिता निशिकांत पाटील, ३) कमला दत्तात्रेय म्हात्रे, ४) संगीता अशोक म्हात्रे, ५) संदीप दत्तात्रेय म्हात्रे, ६) सुमेधा सूर्यकांत गावंड आणि ७) रमाबाई हरिश्चंद्र म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये /विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- हाशिवरे, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५/३/अ, एकूण क्षेत्र ००-४२-३० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ४.६३/-
ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०५/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे सागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रमोद यशवंत भगत, यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| सागांव, ता.अलिबाग, जि. रायगड | ८२/१/१ | जि. ०-६३-३० <br> व. ०-२३-६० <br> पो.ख. ०-०३-४० <br> ०-९३-३० | १३.४८ |

वर नमूद एकूण जमिन मिळकती पैकी ०-१५-०० हे.आर.चौ.मी.क्षेत्र हे या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग,
दि. २९/०४/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
**ऑफीस -रूतुराज प्लाजा,**
**फ्लॅट नं.१ तळ मजला**
**शिवाजी चौक गावडे ऑप्टीक्स,**
**अलिबाग रायगड ४०२ २०१**
**मो. ९८५००४२२३४/७७४१०३२२३४**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३१/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. कलीम यासीन घारे,
रा.मांडला., ता. मुरुड, जि. रायगड — अर्जदार
विरुध्द
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मांडला, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०८-०६-१९९६ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्राम पंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि.०८-०६-१९९६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दिनांक १५-५-२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता.०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड रायगड)

ज.म.र अर्ज ३०/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. सुनिता भालचंद्र चोगले,
रा.शिवाजी नगर कोळीवाडा मुरुड, — अर्जदार
ता. मुरुड, जि. रायगड
विरुध्द
मुख्याधिकारी,
नगर परिषद मुरुड, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १३/०५/१९७१ रोजी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगर परिषद मुरुड, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १३/०५/१९७१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल सौ. शैलजा संजीव यादव आणि श्री. संजीव यादव यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. विनायक घनशाम चव्हाण आणि सौ. पुनम विनायक चव्हाण, राहणार मौजे टॉवर ९/३२०२, रूनवल फॉरेस्ट, एल.बी.एस रोड,भांडूप (प.), मुंबई, ४०००७८ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे बिड ब्रु., ता.कर्जत,जि.रायगड | ५६/१अ | ०.३०.०० | ०.३७ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी यापमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ३०.०४.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव,
ता.कर्जत,जि.रायगड.
मो. नं ९३०७८८५७११

# कर्जत कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत

**मुख्य बाजार आवार, दहिवली तर्फे नीड,**
**ता. कर्जत, जि. रायगड**

ई मेल am-karjatraigad@msamb.com

जा.क्र.०७/गाळे व कार्यालय/जाहीर नोटीस/सन२०२६.
दिनांक- ३०/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

कर्जत कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत ता. कर्जत जि. रायगड मुख्य बाजार आवारातील गाळे २९ वर्ष मुदती करिता शेती व शेती पूरक परवानाधारक व्यवसायाकरिता भाडे तत्वावर (लिजने) देण्याकरिता जाहिर लिलाव (उघड बोली पद्धतीने) बाजार समितीचे कार्यालयांत होणार असून लिलावाची तारीख, उपलब्ध गाळ्यांची व कार्यालयाची संख्या इत्यादी तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | शेतीमालाशी निगडीत व्यवसायाकरिता (परवानाधारक) |
|---|---|---|
| १) | लिलावाची तारीख वार व वेळ | शनिवार दि. १६/०५/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजता |
| २) | तळमजल्यावरील गाळे संख्या ४ | गाळा क्रमांक-१,२,३,४ |
| ३) | अनामत रक्कम (बिनव्याजी) | ३५ लाख रुपये |
| ४) | पहिल्या मजल्यावरील कार्यालय संख्या ४ | ५/-लाख रुपये अनामत रक्कम बिनव्याजी |
| ५) | मासिक भाडे कार्यालायाचे | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमास अधीन राहून (P.W.D) च्या नियमानुसार |

सविस्तर निविदा सूचना व अटी शर्ती कार्यालयीन वेळेत समितीचे कार्यालयात पहावयास मिळतील. लिलावात भाग घेण्याकरिता कोरा विहित नमुना अर्ज बाजार समितीचे कार्यालयात शनिवार दि. ०२/०५/२०२६ ते शनिवार दि. १६/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत रक्कम रुपये. १०००/- (अक्षरी एक हजार मात्र) ना परतावा रोखीने भरल्यास मिळतील. तसेच परिपूर्ण भरलेले अर्ज कार्यालयीन वेळेत शनिवार दि. ०२/०५/२०२६ ते शनिवार दि.१६/०५/२०२६ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत अनामत रक्कम रु. २०००००/-चा डीडी किंवा आरटीजीएस केलेली स्लीप सह अर्जासोबत जोडून समितीचे कार्यालयात स्विकारण्यात येतील. तद्नंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच सदरचे जाहिराती नुसार वाटप होणारे तळमजल्यावरील गाळे व पहिल्या मजल्यावरील कार्यालय आहेत यांची नोंद घ्यावी. तसेच लिलावास अर्जदार यांनी स्वता: उपस्थित राहून भाग घेतला पाहिजे.

दिनांक ३०/०४/२०२६
श्री.वासुदेव मुकुंद भोईर, प्र.सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत- रायगड
Mobile no.९२०९२०४२३७

**श्री. प्रकाश नानू फराट**
सभापती
कर्जत कृषि उत्पन्न बाजार समिती-कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड.
Mobile no.9420837232

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेल्या मिळकती विद्यमान मालक श्री. रमेश कृष्णा पाटील यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मौजे नागांव, ता.अलिबाग | ७६१ (PU-ID २४८९६४५५११२) | ०.४४.२० | ८.१२ |

पैकी श्री.रमेश कृष्णा पाटील यांचे मालकीचे ०.०२.०० हे.आर.चौ.मी.इतके क्षेत्र

सदरहु मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकत पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३०.०४.२०२६
जमीन मालकाची सही

**श्री.अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

प्रोसेस जमा — अर्जदारातर्फे वकिल
दि. — अँड. अनिकेत गुरव

**अलिबाग येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश क- स्तर सो.**
**श्रीमती एस.ए.पर्वतकर सो यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज नं.५४/२०२६

**जाहीर नोटीस**

१) श्रीमती विशाखा विजय मानकर
२) सौ. पुजा अभिजीत पाटील
(पूर्वाश्रमीची पुजा विजय मानकर) — अर्जदार
३) सौ. भक्ती अविनाश कुंबार
(पूर्वाश्रमीची भक्ती विजय मानकर)
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील कै. विजय शाम मानकर हे दिनांक ०९/०१/२०२६ रोजी गोविंद बंदर, अलिबाग येथे मयत झालेले असून त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार नं. १ ते ३ यांनी वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) मिळणेकरीता मे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि. १०/०६/२०२६ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेचा हुकूम अर्जदार नं. १ ते ३ यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. ३०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/- — सही/-
**कनिष्ठ लिपीक — अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय — दिवाणी न्यायाधिश**
**व. स्तर अलिबाग — व. स्तर अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील यानी खालील लिहून देणार मिळकतीचे मालक मालक मनीषा राजेंद्र काकडे आणि संतोष व्यंकटेश शिंदे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे मुगपे , ता.कर्जत ,जि.रायगड**

| सर्व्हे नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १६/१अ | २.४१.०० गुंठे | ०.९५ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वैगरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक : १/५/२०२६

**वकील महेश अरुण शेळके**
पत्ता - मु सालपे ,पो.कोंदिवडे
ता. कर्जत,जि.रायगड
मो नं ९३०७६५५७६९

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग यांचे कार्यालय**
**मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात अलिबाग - ४०१२०१**
दुरध्वनी क्र. ०२१४१२२२४२८. Email: dslrraigad@gmail.com
क्र.अपील/एस.आर.३७/२०२५ ता. माणगांव जि. रायगड/२०२६/४०४ अलिबाग दिनांक :२९/०४/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति
१. निगार सुलताना अब्दुल गणी जुवले — अपीलदार
रा. साई, ता. माणगांव, जि. रायगड

**विरुद्ध**

१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, माणगांव — जाबदार
ता. माणगांव, जि. रायगड
२. रजिया नसरुद्दीन सोलकर
३. नुरजहाँ म जाफर सोलकर
४. सौदाबी दाऊद सोलकर
५. म. अली म जाफर सोलकर
६. मुमताज अ. अजिज सोलकर
७. सुलताना अ. लतिफ जालगांवकर
८. इम्रान अ. लतिफ जालगांवकर
९. तनवीर अ. लतिफ जालगांवकर
१०. तैसीम अ. लतिफ जालगांवकर
११. रफत इनुसमिया सोलकर
१२. खुर्शीद इसुफ बड़े
१३. नुरबेगम मुबिन सोलकर
१४. म. इकबाल इनुसमीया सोलकर
१५. मैमुना इनुसमिया सोलकर
१६. म. आरीफ इनुसमीया सोलकर
१७. म. फारुख इनुसमीया सोलकर
१८. अजिम इनुसमीया सोलकर
१९ मुद्दसीर म. हनीफ सोलकर
२०. अब्दुल अजीज शहाबुद्दीन सोलकर
२१. अब्दुल कय्युम म. युसूफ सोलकर
२२. अब्दुल रहीम म. युसूफ सोलकर
२३. अब्दुल हननान म. युसूफ सोलकर
२४. अमिना शहजाद बंदरकर
२५. आतीफा अब्दुल्ला म्हैसकर
२६. नसीमा म युसूफ सोलकर
२७. नसीमा म हनीफ सोलकर
२८. मुज्जमील म. हनीफ सोलकर
२९. आमिन हारून सोलकर
३०. मामुन हारून सोलकर
३१. मोतसीम हारून सोलकर
३२. मुबीन हारून सोलकर
३३. अंजुम तारीक काझी
३४. मासुम मकसुद रखांगे
३५. तबस्सुम मुजीब परकार
३६. तरन्नुम अशफाक काझी
३७. तन्सीम इकबाल सोलकर
क्र. २ ते ३७ रा. साई, ता. माणगांव, जि. रायगड

विषय :- मौजे साई, ता. माणगांव, जि. रायगड येथील सि.स.नं. ५४५. ५४६ ५४७.५५६ व ५५७ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार निगार सुलताना अब्दुल गणी जुवले यांचा दिनांक २६/०६/२०२४ चा अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र. अपील एस. आर. ३७/२०२५/ ता. माणगांव जि. रायगड २०२६ ३२८ अलिबाग दिनांक १५/०४/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या नियमित सुनावणीची तारीख १३.०४.२०२६ २०.०४.२०२६ व २८.०४.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार क्र. ९, १३, १४, १८, ३३, ३४, ३५ व ३७ हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक १२/०५/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग — सही/-
दिनांक : २९/०४/२०२६

**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु. अलिबाग.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील १) गट नं. ३५३, एकूण क्षेत्र ०-१३-९० हे. आर., आकार २.४५ रू. पै. २) गट नं. ३५४, एकूण क्षेत्र ०-०१-७० हे. आर., आकार ०.३५ रू. पै. ३) गट नं. ५८८/१, एकूण क्षेत्र ०-०१-०० हे. आर., आकार ०.०३ रू. पै. ४) गट नं. ५८८/२, एकूण क्षेत्र ०-०१-०० हे. आर., आकार ०.०२ रू. पै. ५) गट नं. ५८९, एकूण क्षेत्र ०-०१-०० हे. आर., आकार ०.०२ रू. पै. ६) गट नं. ८१, एकूण क्षेत्र ०-०३-०० हे. आर., आकार ०.७० रू. पै. या मिळकती, तसेच या मिळकतीतील ग्रामपंचायत झिराड, मालमत्ता क. १३५ व ९११ या घर मिळकती, या मिळकतीचे विद्यमान मालक १) दिपाली दिलीप खेर, २) दिलीप रामकृष्ण खेर दोघेही रा. गिरगांव, मुंबई यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ३०/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल जॅकी ॲन्थोंनी लोबो व अनिता लोबो दोघेही रा.लालबाग, मुंबई यांनी मौजे अलिबाग नगरपालिका हद्दीतील खालील वर्णनाच्या निवासी गाळ्यांच्या मिळकती, त्यांचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय श्रीधर नवरे व श्री.अनिकेत दत्तात्रेय नवरे दोघेही रा. पाध्ये वाडी, बँक ऑफ इंडिया समोर अलिबाग यांसकडून कायमस्वरुपी मिळकती विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी निवासी गाळ्यांचे मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र | सोसायटीचे नाव | फ्लॅट नंबर | क्षेत्र | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | समृद्धी को.ऑप.हौ. सोसायटी जुना मालमत्ता क्र.६८६ | ००२ (तळ मजला बी विंग) | ५७२ चौ.फुट (५३.१६चौ.मी) | श्री. अनिकेत दत्तात्रेय नवरे |
| २ | समृद्धी को.ऑप.हौ. सोसायटी जुना मालमत्ता क्र.६८६ | ००३(तळ मजला बी विंग) | ६०० चौ. फुट (५५.७६ चौ.मी) | श्री. दत्तात्रेय श्रीधर नवरे |

सदर मिळकतींवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतींवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकती या निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतींसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती व तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दि. ३०/०४/२०२६

**ॲड. सुनिल के.वाकडे**
हिराबाग को. ऑप. हौ. सोसा. डी-१,
तळ मजला, मोदकम हॉटेल शेजारी,
अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९८६७७१५५२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सोनाली राहुल खरात यांनी खालील नमुद केलेली बिनशेती मिळकत व त्यातील घर मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक चैतन्य नंदकुमार पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | १२०२ | २.०८.०० | २०.८० |

वर नमुद केलेली बिनशेती मिळकत व त्या मिळकतीत असलेले ग्रुप ग्रामपंचायत नागांव घर मालमत्ता नं. ९१७ क्षेत्र ३६० चौ.फुट ३३.४६ चौ.मी. या घर मिळकतीसह बिनशेती मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसि झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. स्वरूपा स्वप्नील गायकवाड**
मोबा.नं. ८९९९८८९०३९
Resi : Shop No.2, Opp
SBI Bank, At: Post Zirad,
Tal Alibag-Raigad
Email : swarupagaikwad@gmail.com

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग यांचे कार्यालय**
**मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग ४०२२०१**
दुरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८, Email: dslrraigad@gmail.com
क्र. अपील/एस.आर.१९/२०२५/ता.रोहा/जि.रायगड/२०२६/४१२ अलिबाग दिनांक २८/०४/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. बेबी नारायण सानप
उर्फ सुनिता उमाजी जाधव — अपिलदार
रा.मु.पो.धामणसई, ता.रोहा, जि.रायगड

**विरूद्ध**

१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, रोहा
ता. रोहा, जि. रायगड
२. लक्ष्मण तुलाजी दळवी (मयत) तर्फे वारस
पांडुरंग लक्ष्मण दळवी (मयत) तर्फे वारस
२/ १. मधुकर पांडुरंग दळवी — २/२. गुणाजी पांडुरंग दळवी (ए.कु.पु.)
रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
२/३. रुक्मीणी पांडुरंग दळवी (मयत) — २/४. विठाबाई विठोबा जवरत
रा. मु. पो. देवकान्हे, ता. रोहा, जि. रायगड
३. महादेव दामा दळवी (मयत) तर्फे वारस
३/१. काशी हरीश्चंद्र शेलार (मयत) तर्फे वारस — ३/१/२. गणेश हरिश्चंद्र शेलार
३/१/१. धर्मा हरिश्चंद्र शेलार
३/१/३. रोहिदास हरिश्चंद्र शेलार
३/१/१ ते ३/१/३ रा. मु. सांगडे, पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
३/१/४. रेश्मा नथुराम बामणे
रा. मु. पो. देवकान्हे, ता. रोहा, जि. रायगड
३/१/५. जयश्री जगन्नाथ गायकवाड
रा.मु.पो.नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड
३/२. हशी मारुती कदम (मयत) तर्फे वारस
३/२/१. साधुराम मारुती कदम — ३/२/२. संजय मारुती कदम
३/२/३. गुलाब ज्ञानदेव भोकटे
३/१/१ ते ३/१/३ रा. मु. गावठाण, पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
३/३. धर्मी शंकर बलकावडे
रा. मु. सोनगाव, पो. पिंगळसई, ता. रोहा, जि. रायगड
३/४ सोनी पंढरी बळकावडे (मयत) तर्फे वारस
३/४/१ प्रमोद पंढरी बामुगडे
रा. मु. किल्ला, ता. रोहा, जि. रायगड
३/४/२. रुक्मीनी विटोबा भाटक
रा. मु. धाटाव, ता. रोहा, जि. रायगड
३/४/३. प्रमिला उमेश शिंदे
रा. मु. किल्ला, ता. रोहा, जि. रायगड
३/५. मनी महादेव दळवी (मयत)
३/६. नरेश महादेव दळवी
३/७. कृष्णा महादेव दळवी
क्र. ३/६ व ३/७ रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड
३/८. चंद्रकला चंद्रकांत गोवर्धने
रा. मु. पो. मेढा, ता, रोहा, जि. रायगड
४. निरा दगडु महार उर्फ जाधव (मयत) तर्फे वारस
४/१. तुळशीराम दगडु जाधव — ४/२. पार्वती रघुनाथ शिंदे
४/३. ताराबाई रघुनाथ शिंदे — ४/४. प्रभावती विठ्ठल सोनावणे
क्र. ४/१ ते ४/४ रा. मु. पो. धामणसई ता. रोहा, जि. रायगड
५.गणपत सहादेव पोटफोडे (मयत) तर्फे वारस
चिंदु गणपत पोटफोडे
रा. मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड

विषय :- मौजे धामणसई, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नं.२६६ ते २७० या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार बेबी नारायण सानप उर्फ सुनिता उमाजी जाधव यांचा दिनांक १३/०२/२०२४ रोजीचा अपील अर्ज..
२. इकडील पत्र क्र. अपील/एस. आर. १९/२०२५/ ता.रोहा/जि.रायगड/२०२६/३१९ अलिबाग दिनांक १३/०४/२०२६


उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या नियमित सुनावणीची तारीख १३.०४.२०२६, २०.०४.२०२६ व २८.०४.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार क्र. २/१, ३/१/५, ४/१ ते ४/४ हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख १२/०५/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग — सही/-
दिनांक : २८/०४/२०२६

**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु. अलिबाग.**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## भंगार खरेदीदारांना आवाहन

**रायगड :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल या संस्थेमधील निर्लेखित झालेले निरुपयोगी व भंगार साहित्याची दरपत्रके मागवून विक्री करावयाची आहे. याकरिता इच्छुक जी.एस.टी.धारक भंगार खरेदीदारांनी विहित नमुन्यातील नमुना अर्ज डिडी.सह ८ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल येथे जमा करावे, असे आवाहन प्र. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल वि.द.टिकोले यांनी केले आहे.हे भंगार साहित्य संबंधित विभागामध्ये ठेवण्यात आलेले असून सदरचे सर्व साहित्य आहे त्या स्थितीत निविदा पध्दतीने विक्री करणे प्रस्तावित आहे. यामध्ये निरनिराळ्या व्यवसायामधील जुन्या व निकामी झालेल्या यंत्रसामुग्री हत्यारे, उपकरणे, फर्निचर, संगणक, संगणक सामुग्री, आय. टी. उपकरणे तसेच भंगार व निरुपयोगी साहित्याचे एम.एस. स्क्रॅप, ट्युबपट्टी स्क्रॅप, प्लॅस्टिक स्क्रॅप, रिकामे टोनर, टायर स्क्रॅप, पेपर रद्दी इत्यादी विविध प्रकारच्या बाबी समाविष्ट आहेत.या निविदा प्रक्रियेकरीता लिफाफापध्दतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस.टी. नोंदणी धारक भंगार खरेदीदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत असून ज्या खरेदीदाराचे दर कमाल असतील अशा पात्र जी.एस.टी. नोंदणी धारक खरेदीकारास भंगार साहित्याची विक्री करण्यात येईल. विक्री करावयाच्या वस्तु संबंधित विभागामध्ये ०२ मे ते ११ मे या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून पहावयास मिळतील. या कालावधी दरम्यान सादर करावयाच्या विहित नमुन्यातील अर्ज प्रति निविदा रु.३०० संस्थेच्या कार्यालयामधून विकत घेता येतील. सदर नमुन्यातील अर्जातील माहिती अचुकपणे निविदे सोबत रु. ३,००० अनामत रक्कम म्हणून जमा करणे अनिवार्य असेल. या रकमेचा धनाकर्ष, **Registrar, Industrial Training Institute Panvel, Dist-Raigad** यांच्या नावाने डिडी.च्या स्वरुपात करावा.

## प्रफुल्ल पुरो यांचे देहावसान

**उरण :** उरण तालुका रिक्षा युनियनचे संस्थापक, विद्यमान अध्यक्ष तथा नागाव-म्हातवलीतील ज्येष्ठ समाज कार्यकर्ते प्रफुल्ल किशोर पुरो यांचे सोमवारी दीर्घ आजाराने देहावसान झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षांचे होते. वरीष्ठ पत्रकार प्रवीण पुरो यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. प्रफुल यांच्या निधनावर शोक व्यक्त करण्यासाठी उरणमधील रिक्षा वाहतूक दुपारनंतर बंद ठेवण्यात आली होती. प्रफुल पुरो यांच्या निधनाने रिक्षा चालक-मालकांचा आधार हरपला असून नागाव आणि



म्हातवली क्षेत्रातील सामाजिक कार्यक्षेत्रात पोकळी निर्माण झाल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. प्रफुल्ल यांनी दीर्घकाळ समाजसेवा केली, असंख्य गरजू व्यक्तींना मदत केली आणि आपल्या सकारात्मक वृत्तीने त्यांनी सर्वांना प्रोत्साहन दिले. त्यांचं साधं राहणीमान, प्रामाणिकपणा आणि समाजहितासाठी असलेलं असीम समर्पण येणाऱ्या पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील, अशा प्रतिक्रिया मान्यवरांनी व्यक्त केल्या. नागाव येथील अमरधाम स्मशानभूमीत प्रफुल यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. तेव्हा विविध क्षेत्रातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. प्रफुल्ल यांचे पुत्र लैलेश यांनी त्यांना मुखाग्नी दिला. याप्रसंगी उरण तालुका रिक्षा युनियनचे पदाधिकारी रवी कोळी, अनंत घरत, चारुदत्त पाटील, उरण तालुका समन्वय समितीचे माजी अध्यक्ष काशिनाथ गायकवाड यांनी प्रफुल्ल पुरो यांच्या आठवणींना उजाळा दिला. ज्येष्ठ पत्रकार प्रवीण पुरो यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण,पत्नी, पुत्र, दोन मुली, जावई असा परिवार आहे.

## ‘भ्रष्टाचार आणि दिरंगाईमुक्त प्रशासनासाठी कटिबद्ध राहा’

**रायगड :** सामान्य नागरिकाला शासकीय सेवा मिळवताना होणारा मनस्ताप, विलंब आणि कागदपत्रांचा डोंगर आता इतिहासजमा होणार असून, रायगड जिल्ह्याला सेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्यात अग्रक्रमांकावर नेण्याचा निर्धार जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी व्यक्त केला. ‘सेवा हक्क दिना’चे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभाराची शपथ दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.जिल्हाधिकारी जावळे यांनी प्रशासकीय मानसिकतेत बदलाची गरज अधोरेखित करताना स्पष्ट केले की, देशाला विकसित आणि समृद्ध करण्याच्या प्रवासात सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानणे अत्यावश्यक आहे. सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्यापेक्षा नागरिकांना घरबसल्या आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी कंबर कसण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.विशेषतः सेतू केंद्रांमध्ये कामासाठी येणाऱ्या जनतेशी सौजन्याने वागून, त्यांना विनाकारण ताटकळत न ठेवता अनावश्यक कागदपत्रांची मागणी टाळावी, असे त्यांनी निर्देश दिले. ज्या विभागांची कामगिरी सध्या समाधानकारक नाही, त्यांनी तातडीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील तरतुदींचा सखोल अभ्यास करून आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करावी. प्रत्येक विभागाची सेवा वितरणाची टक्केवारी ९८ च्या पुढे असणे आवश्यक असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्या किंवा सुमार कामगिरी करणाऱ्या विभागांसाठी पाच हजार रुपयांच्या दंडाची तरतूद असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी देखील प्रशासकीय यंत्रणेला अधिक गतीमान होण्याचे आवाहन केले.

# पनवेलकरांसाठी ‘पाणी परिषद’

### ५ मे रोजी फडके नाट्यगृहात आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शहरात वाढत चाललेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी पनवेल महापालिकेकडून महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. येत्या ५ मे रोजी दुपारी तीन वाजता पनवेलच्या आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पाणी परिषद आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा महापौर नितीन पाटील यांनी नुकतीच केली. या परिषदेत शहरातील गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नावर सविस्तर चर्चा होणार असून नागरिकांच्या अडचणींना केंद्रस्थानी ठेवले जाणार आहे. नेमके पुरेसे पाणी पनवेलकरांना कधी मिळणार, या सर्वसामान्यांचे उत्तर या परिषदेत मिळण्यासाठी महापालिका सदस्य प्रयत्नशील असतील.

या परिषदेत महापालिकेचे नगरसेवक त्यांच्या-त्यांच्या प्रभागातील पाणीस्थितीचा आढावा मांडणार आहेत. विशेषतः गृहिणींना दररोज भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्यांचा आणि नागरिकांना करावा लागणाऱ्या टँकरवरील अवलंबित्वाचा लेखाजोखा सादर केला जाणार आहे.



खारघर उपनगरातील अनेक मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांची हीच स्थिती आहे. कोट्यवधींची सदनिका खरेदी केली. या स्मार्ट शहरांमध्ये घराजवळ आंतरराष्ट्रीय विमानतळ, गोल्फ कोर्स, तसेच येऊ घातलेले आंतरराष्ट्रीय कोर्पोरेट पार्क असे भव्यदिव्य शहराचे नियोजन असले तरी सध्या या स्मार्ट शहरातील नागरिकांना टँकरच्या पाण्यावर लाखो रूपये खर्च करून आपली तहान भागवावी लागत आहे. गेल्या काही वर्षांत खारघर, तळोजा आणि कामोठे परिसरात राहणाऱ्या नागरिकांना नियमित पाणीपुरवठा न मिळाल्याने टँकर खरेदी करणे भाग पडत आहे. अपुरे पाणी असल्याने प्रशासनाला डोकेदुखी ठरणारी पाणी सेवा अद्याप सिडको मंडळाकडून पनवेल महापालिकेने हस्तांतरण केली नाही.

मात्र नागरिकांच्या या समस्येकडे लक्ष्य वेधण्यासाठी निवडणुकीपूर्वी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सिडको भवनात शिरून आंदोलन केले. सिडकोच्या प्रवेशव्दारावर आंदोलन केले. विरोधकांनी सिडकोला जाब विचारला. सिडकोने आंदोलन करणाऱ्यांना लेखी आश्वासन दिले. तरीही या प्रश्नावर ठोस उत्तर मिळत नाही.

सध्या पनवेल महापालिका क्षेत्रात सध्या सुमारे ३० एमएलडी पाण्याची कमतरता आहे. ही तूट भरून काढण्यासाठी प्रशासनाने विविध जलस्रोत वाढविण्याचे आणि जलसंधारणाच्या योजना पूर्ण करण्यासाठी गेल्या तीन वर्षांत त्यांच्या प्रयत्नांचा तपशीलही परिषदेत मांडला जाण्याची शक्यता आहे. यामध्ये उदंचन केंद्रातून खाडीत वाहून जाणाऱ्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर प्रकल्प, पावसाळी वाहून जाणाऱ्या पाण्याचा वापर, शिलार धरण या नवीन जलयोजनेसाठी महापालिकेची तयारी, या योजनेसाठी उभारण्यात येणाऱ्या निधीचे पर्याय यांची माहिती यावेळी दिली जाणार आहे.

महापालिकेकडून शहरात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला तरी टँकर मागविण्याची स्पष्ट कार्यपद्धती अद्याप नागरिकांपर्यंत जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच टंचाईच्या काळात मोफत पाणीपुरवठ्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे. या सर्व मुद्द्यांवर ५ मे रोजीच्या परिषदेत सखोल चर्चा होणार असल्याने नागरिकांचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.

न्हावाशेवा टप्पा जलयोजनेचे काम पुर्ण झाल्यास पनवेल महापालिका क्षेत्रात १०० एमएलडी पाणीपुरवठा मिळू शकेल. त्यामुळे २२८ एमएलडी पाणी पनवेल परिसराला मिळणार आहे. २०२० मध्ये सुरू झालेली ही योजना २०२३ या तीन वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित होते; मात्र २०२६ पर्यंतही ती अपूर्णच आहे. मुख्यमंत्र्यांनी महापालिका निवडणूकीत ४८०० कोटी रूपयांच्या शिलार धरणाचे कार्यादेश दिल्याची माहिती रोडपाली येथील प्रचारसभेत दिली. मात्र या योजनेतील पाणी प्रत्यक्षात पनवेलमध्ये येण्यासाठी वर्षानुवर्षे लागणार आहे. त्यामुळे तात्पुरता दिलासा मिळण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाने पनवेलचा पाणी प्रश्नासाठी खास लक्ष्य द्यावे अशी मागणी जोर धरत आहे.

## दिवा-चिपळूण मेमू रेल्वेचा शुभारंभ

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दिवा-चिपळूण या मार्गावर विशेष मेमू गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या आणि तेथून परतणाऱ्या हजारो प्रवाशांचा प्रवास आता अधिक सुलभ, जलद आणि आरामदायी होणार आहे.

आपल्या गावी, नातेवाईकांकडे किंवा निसर्गरम्य किनाऱ्यांकडे धाव घेणाऱ्या प्रवाशांना अनेकदा गर्दीचा सामना करावा लागतो. याच पार्श्वभूमीवर रेल्वेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, प्रवाशांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाची झळक दिसून येत आहे. दिवा-चिपळूणदिवा मेमू या विशेष गाड्या १ मे ते ७ जून या कालावधीत धावणार आहेत. विशेष म्हणजे या गाड्या दर शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी सुरू राहणार असून, एकूण ३६ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. दिवा ते चिपळूण गाडी रात्री ११:२५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ६:३० वाजता पोहोचेल, तर चिपळूण ते दिवा गाडी दुपारी ३:३० वाजता सुटून रात्री ११:१० वाजता पोहोचेल.

# रायगड हापूसचे उत्पादन ३० टक्क्यांनी घटले

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

### ■ पेटीचे दर २५ टक्क्यांनी वाढले

यंदा रायगड जिल्ह्यातील हापूस आंब्याच्या उत्पादनात सुमारे ३० टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे गेल्या वर्षाच्या तुलनेत पेटीचे दर सुमारे २५ टक्क्यांनी वाढले आहेत. गेल्या वर्षी नंबर एक आंब्याची पेटी १ हजार ३०० ते दीड हजार रुपयांना विकली जात होती. मात्र यंदा तीच पेटी खरेदी करण्यासाठी ग्राहकांना दीड हजार ते १ हजार ७०० रुपये मोजावे लागत आहेत.

उत्पादनात घट झाल्यामुळे बाजारात हापूस आंब्याचा पुरवठा कमी झाला आहे. त्याचा थेट परिणाम किमतीवर दिसून येत असून, मागील वर्षाच्या तुलनेत हापूस आंब्याच्या दरात सुमारे २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या बाजारात दर्जानुसार आंब्यांचे दर वाढलेले आहेत. शेतकऱ्यांना कमी उत्पादनामुळे आर्थिक फटका बसला असला तरी वाढलेल्या दरामुळे काही प्रमाणात दिलासा मिळत असल्याचेही चित्र आहे. मात्र ग्राहकांना यंदा हापूस आंबा महागात खरेदी करावा लागत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हवामानातील बदलांचा आंबा उत्पादनावर होणारा परिणाम लक्षात घेता, कृषी तज्ज्ञांकडून योग्य उपाययोजना करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना दिला जात आहे. दरम्यान, यंदा हापूसचे उत्पादन घटल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, अशी प्रतिक्रिया आंबा बागायतदार डॉ. संदेश पाटील यांनी व्यक्त केली आहे.

सर्वसाधारण पेटी हजाराला हापूस आंब्याची प्रतिवारी फळाच्या आकारानुसार ठरवली जाते. २७० ते ३०० ग्रॅम वजनाच्या फळ एक नंबर, २४० ते २७० ग्रॅम वजनाचे फळ दोन नंबर, २१० ते २४० ग्रॅम वजनाचे फळ तीन नंबर म्हणून बाजारात ओळखले जाते. यापेक्षा कमी वजनाच्या फळांची प्रतवारी चार आणि पाच नंबरमध्ये केली जाते.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सोहळा



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुका पंचायत समितीतील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयातील तेलवडे बीटच्या पर्यवेक्षिका शुभांगी कोतवाल, अंगणवाडी सेविका संगीता पाटील, अरुणा भाटकर व बोर्लीतील मदतनीस कांचन शिंदे सेवानिवृत्त झाल्याबद्दल येथील दरबार हॉलमध्ये सेवापूर्ती सोहळा संपन्न झाला.

यावेळी शुभांगी कोतवाल, अंगणवाडी सेविका संगीता पाटील, अरुणा भाटकर, बोर्लीतील मदतनीस कांचन शिंदे तसेच अंगणवाडी सेविका सोनाली ठाकूर वकील झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## सुट्ट्यांमध्ये पार्किंगची समस्या उद्भवणार नाही : चंद्रकांत चौधरी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

सुट्ट्यांच्या हंगामात येथील दस्तुरी नाक्यावर वनखात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या पार्किंगच्या ठिकाणी अपुऱ्या जागेअभावी पार्किंगची सुयोग्य पद्धतीने सुविधा उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे पर्यटकांना नाईलाजाने माघारी जावे लागत होते. याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होत असे. आगामी पर्यटन हंगाम लक्षात घेता नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी बोरीचे मैदानासमोरील जागा साफ करून घेतली असल्याने दीडशे पेक्षाही अधिक वाहने अगदी सहजपणे पार्क होऊ शकतात.

> “पर्यटकांची संख्या वाढली तरच सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. पर्यटन शेतीवर अवलंबून असणाऱ्या सर्वसामान्य कष्टकरी ते हॉटेल व्यावसायिक यांना पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे उत्पन्नात वाढ होणार आहे.पर्यटन वाढीसाठी आमचा नेहमीच प्रयत्न राहणार आहे. - **चंद्रकांत चौधरी,** नगराध्यक्ष माथेरान नगरपालिका”

एमपी प्लॉट ९३ हा अद्यापही नगरपरिषदेकडे हस्तांतरण झालेले नाही. ह्या प्लॉटचे हस्तांतरण केव्हा होईल याबाबत अनिश्चितता वाटत असल्याने दरवर्षी पर्यटकांचा वाढता ओघ लक्षात घेऊन नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी पर्यटन वाढीसाठी हे एक महत्त्वपूर्ण काम हाती घेतले आहे. पर्यटन वाढले तरच इथल्या लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्या दृष्टीने माथेरानचे प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी याठिकाणी आगामी काळात सुसज्ज वाहनतळ उभे राहिल असा विश्वास असून त्याप्रमाणे गावाच्या हितावह कामे पूर्ण करण्यासाठी चंद्रकांत चौधरी यांनी कंबर कसली आहे.



# चिरनेर येथे शिवार फेरीचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथे खरीप हंगामपूर्व तयारीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांसाठी एल निनो जनजागृतीपर शिवार फेरीचे आयोजन केले होते.

कृषि विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवार फेरी या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर एल निनो परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या परिणामांची माहिती देणे तसेच त्यावरील योग्य उपाययोजना, पिक निवड, पाणी व्यवस्थापन व जोखीम कमी करण्याच्या तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे हा होता.

चिरनेर ग्रामपंचायत ते गाव परिसरात आयोजित करण्यात आलेल्या शिवार फेरीस अर्चना सुळ नारनवर, मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ तसेच उप कृषी अधिकारी अलका बुरकूल यांनी उपस्थित राहून उपस्थित शेतकऱ्यांना एल निनो परिस्थितीत पिकांची निवड व पीक व्यवस्थापन, कमी पावसाच्या परिस्थितीत पाणी बचत व सूक्ष्म सिंचन तंत्र, हवामानानुसार शेती नियोजन, सुधारित वाणांचा वापर आणि जोखीम व्यवस्थापन या बाबींवर मार्गदर्शन केले.












## दिनविशेष

### १ मे

१९५६ : जनतेसाठी पोलियोची लस उपलब्ध.
१९९३ : ज्येष्ठ समाजवादी विचारवंत नानासाहेब गोरे यांचे निधन.
२००४ : एस. राजेंद्रबाबू यांनी भारताचे ३४ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
२०१२ : नॉर्वेजियन चित्रकार एडवर्ड माँच यांच्या चित्राची १२० दशलक्ष डॉलर्सला विक्री.
२०१३ : मराठी भाषाविषयक अभ्यासक सत्त्वशीला सामंत यांचे निधन.

## राशीभविष्य

- **मेष** : समस्यातून मार्ग निघेल. प्रशासन सेवेत विशेष अनुकूलता लाभेल. नव्या संधींचा लाभ घ्यावा.
- **वृषभ** : घाईने कोणतेही निर्णय घेऊ नयेत. आर्थिक कामं मनासारखी होतील. सामंजस्यानं रहायला हवं.
- **मिथुन** : खर्च विचाराने करावा. दृष्टांत, साक्षात्कार घडतील. प्रशासन सेवेत प्रगतीच्या संधी लाभतील.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात समाधानकारक घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या संधींचं स्वागत करावं.
- **सिंह** : नव्या कामांना गती मिळेल. वैद्यकीय क्षेत्रात अनुकूलता वाढेल. चिकाटीने प्रगती करता येईल.
- **कन्या** : प्रतिकूलतेतून मार्ग काढावा लागेल. स्थावर प्रश्न संभवतात. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **तूळ** : आर्थिक कामं मनासारखी होतील. शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. अडचणीतून मार्ग निघू शकेल.
- **वृश्चिक** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. कौटुंबिक जीवनात अनुकूलता वाढेल. संततीबाबत शुभ घटना घडतील.
- **धनु** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. नव्या योजना मार्गी लागतील. चिकाटीनं रहायला हवं.
- **मकर** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. सौख्य लाभेल.
- **कुंभ** : धावपळ, दगदग वाढेल. कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. चैनीवर अधिक खर्च होईल.
- **मीन** : आर्थिक कामं मनासारखी होतील. कार्यक्षेत्रात चिकाटीने प्रगती होईल. अडचणी दूर होतील.

## आरोग्यमंत्र

### दातांच्या आरोग्यरक्षणासाठी...

शरीरातील एक दुर्लक्षित राहणारा घटक म्हणजे दात. ते सुस्थितीत असेपर्यंत फारशी काळजी घेतली जात नाही. मात्र दुखणी उद्भवू लागल्यानंतर मात्र त्यांची खरी किंमत कळते. दातांवरचे विविध उपचार प्रचंड महाग असतात. म्हणूनच दातांप्रतीची अनास्था टाळायला हवी. दातांच्या आरोग्यावर कोणत्या गोष्टींचा दुष्परिणाम होतो हे जाणून घ्यायला हवं.



✻ आम्लांमुळे होणारी झीज हे दातांच्या समस्येचं मुख्य कारण आहे. फळांचे रस तसंच सोडा प्यायल्याने दातांवर परिणाम होतो. अशा साखरयुक्त आणि आम्लयुक्त पेयांमधून तोंडात काही घटक सोडले जातात. या घटकांमुळे आम्लाची निर्मिती होते आणि त्यामुळे दातांवरचा संरक्षित थर कमी होतो. आम्लाच्या या हल्ल्याचा प्रतिकार करण्याची क्षमता लाळेत असते. लाळेमुळे सायट्रिक ॲसिडचा प्रभाव कमी होतो. म्हणूनच लाळेची निर्मिती करण्यासाठी शुगरफ्री चुईंग गम खाण्याचा सल्ला डेंटिस्ट देतात. ✻ दातांवर दुष्परिणाम करणारं आणखी एक कारण म्हणजे ब्रुक्सिझम. ब्रुक्सिझम म्हणजे दात कराकरा वाजणं. वय वाढलं की झोपेत दात कराकरा वाजतात. यामागील नेमकं कारण माहीत नसलं तरी हे दातांसाठी योग्य नाही. ✻ खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे दातांवर डाग पडतात. धूम्रपानामुळेही दात खराब होतात. त्यामुळेच अशा वाईट सवयी सोडल्या पाहिजेत. पांढरेशुभ्र दात हवे असतील तर सिगारेटपासून कटाक्षाने दूर रहायला हवं.

## सफर देशांची

### लाल समुद्राकाठचा एरिट्रिया

एरिट्रिया हा आफ्रिका खंडातला छोटासा देश आहे. लाल समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेल्या या देशाच्या सीमा सुदान, इथिओपिया आणि डिजिबौतीशी जोडलेल्या आहेत. इथले बरेच लोक 'ट्रिग्रिन्या' ही भाषा बोलतात. यासोबतच अरबी भाषा बोलणाऱ्यांची संख्याही बरीच जास्त आहे. 'नक्फा' हे या देशाचं चलन आहे. एरिट्रिया हा खूप गरीब देश आहे. परदेशात राहणाऱ्या एरिट्रियन नागरिकांवर या देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. हे लोक आपल्या कुटुंबाला पैसे पाठवतात. एरिट्रियातले बरेच लोक शेती करतात. फुटबॉल आणि सायकलिंग हे इथले लोकप्रिय खेळ आहेत. या देशातले खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकताना दिसतात. २४ मे १९९३ ला एरिट्रिया स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. एरिट्रियावर विविध देशांचं राज्य होतं. इथलं वातावरण उष्ण आणि कोरडं आहे. इथल्या लोकांना पुरेशा प्रमाणात अन्नही मिळत नाही. अस्मारा ही एरिट्रियाची राजधानी आहे. या देशाला एक हजार किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. शेती हा इथल्या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. लाल समुद्राजवळ असल्यामुळे एरिट्रियामधले लोक मासेमारीही करतात. इथून मासे निर्यात केले जातात.

## स्टाईल स्टेटमेंट

### परफेक्ट लूक फॉर मेहंदी

सध्याच्या लग्नसोहळ्यांमध्ये मेहंदीचाही जोरदार समारंभ असतो. या दिवशी नववधू छान सजते. मेहंदीला उपस्थित राहणाऱ्या महिलाही वेगवेगळ्या प्रकारचे ट्रेंडी पेहराव करतात. या समारंभात लेहंग्याला अनेकजणींची पसंती असते. सर्वसाधारणपणे महिलावर्ग ब्राईट रंगाच्या लेहंग्यांना प्राधान्य देतो. हिरवा, पिवळा, केशरी अशा रंगांची चलती असते. यासोबतच आता पेस्टल रंगांची क्रेझही आहे. मेहंदी समारंभासाठी पेहराव शोधत असाल तर या टिप्स तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील.

✻ या दिवशी रंगीबेरंगी लेहंगा कॅरी करता येईल. या लेहंग्यात नवरी मुलगी शोभून दिसेल. सगळ्यांचं लक्ष तिच्याकडेच वेधलं जाईल.

✻ मेहंदी समारंभाला मेहंदी रंगाचा लेहंगा ट्राय करता येईल. गोल्डन वर्कवाला मेहंदी कलरचा लेहंगा शोभून दिसेल. मंगलप्रसंगी रंगसंगतीला खूप महत्त्व असतं. ब्राईट रंग शोभून दिसतात. त्यामुळे कपड्यांची निवड करताना रंगाकडे विशेष लक्ष द्या. (क्रमशः)

## पंचांग

**शुक्रवार, १ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख शु.१५ **(महाराष्ट्र दिन, बुद्ध पौर्णिमा)**, चंद्रराशी : तूळ, नक्षत्र : स्वाती, योग : सिद्धि, सूर्योदय ६.१३, सूर्यास्त ६.५९

## फॉरवर्ड्स

**फ़िक्र हैं यहाँ सबकों ख़ुद क़ो साबित करने क़ी...**

**ज़ैसे ये ज़िन्दग़ी ज़िन्दग़ी नहीं क़ोई इल्ज़ाम हैं...!**

## भटकंती

दोस्तांनो, महाराष्ट्रातल्या ऑफ बीट लोकेशन्सच्या शोधात असाल तर औरंगाबादजवळच्या म्हैसमाळला जाता येईल. म्हैसमाळ हे थंड हवेचं ठिकाण आहे. या ठिकाणाच्या आसपास बरीच धार्मिक स्थानंही आहेत. त्यामुळे नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद घेण्यासोबतच थोडी मनःशांती हवी असेल तर तुम्ही या ठिकाणाला भेट देऊ शकता. म्हैसमाळला पर्यटकांची खूप गर्दी नसते. त्यामुळे तुम्ही शांतपणे या भागात फिरू शकता. औरंगाबादपासून ३७ किलोमीटरवर तर खुल्दाबादापासून अवघ्या १२ किलोमीटर अंतरावर हे स्थान वसलं आहे. (क्रमशः)

## करिअरवाटा

### अभ्यासक्रम आत्मविश्वास वाढवणारे

विद्यार्थ्यांना हमखास नोकरी मिळवून देऊ शकतील वा व्यावसायिक क्षेत्रात उतरले तर विद्यार्थी तिथं उत्तम यश मिळवू शकतील असे काही अभ्यासक्रमांवर उपलब्ध आहेत. कारकिर्दीचा विचार करताना अशा अभ्यासक्रमांवर भर द्यायला हवा. एनआयआयटी ही संस्था माहिती-तंत्रज्ञानाशी संबंधित विविध अभ्यासक्रम आणि परीक्षा घेणारी संस्था आहे. या संस्थेने आपल्या अभ्यासक्रमांना वेगळं वळण दिलं आहे. विविध उद्योगांना कोणत्या प्रकारचे तंत्रज्ञ लागतात याची माहिती घेऊन त्यांच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षण देण्याचा उपक्रम इथे राबवला जातो. म्हणजे हे अभ्यासक्रम जॉब ओरिएंटेड आणि गरजेवर आधारलेले असतात. एनआयआयटी बरोबरच अन्य काही संस्थांनीही अशा प्रकारचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम मुख्यत्वे कंपन्यांनी सुचवलेले असतात. प्रत्यक्ष कंपन्यांशी संबंध आल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या कंपन्यांकडूनच प्रॅक्टिकल अनुभव मिळवून दिला जातो. हे विद्यार्थी बराच काळ त्या संस्थेत काम करतात. अशा रितीने नोकरी करणार आहोत त्या कंपनीतच कामाचा अनुभव मिळत असल्यामुळे उमेदवारांचा आत्मविश्वास वाढतो यात शंका नाही.



## खेचाखेची

### अधिक मास

बँकेच्या पेन्शन पेमेंट विभागाचा अधिकारी बेशुद्ध पडला...

तपासल्यावर कळलं, की...

एका पेन्शनधारक आजीने त्याला विचारलं होतं...

.
.
.

अधिक महिन्याची पेन्शन या महिन्याच्या पेन्शनसोबतच मिळणार की वेगळी?

## वेगळं काही

मध्यंतरी बडोद्यातल्या विहाभाई भरवाड यांनी १२५ फूट लांब आणि ५२६० किलो वजनाची ही अगरबत्ती तयार केली होती. ही अगरबत्ती बनवण्यासाठी ११ लाख रुपये खर्च आला होता. जवळपास १०० दिवस म्हणजे ३०० तास खर्चून त्यांनी ही कमाल करून दाखवली आहे. ही अगरबत्ती तयार करण्यासाठी तीन हजार किलो शेण, ७०० किलो नारळाची साल, ७०० गुग्गुळ, ४५० किलो बार्ली, २५० किलो लाकूड आणि १५० किलो गायीचं तूप एवढं साहित्य लागलं. विहाभाई सातत्याने अशा भन्नाट गोष्टी करत आले आहेत. २०१४ मध्ये त्यांनी १११ फूट लांब आणि ३००० किलो वजनाची तर २०१६ मध्ये त्यांनी १२१ फूट लांब आणि ४००० किलो वजन अगरबत्ती बनवली होती.

## स्टे हेल्दी

### करा योगसाधना

योगसाधना ही आपल्या देशाची संपन्न परंपरा आणि खूप मोठा वारसा आहे. या पारंपरिक प्रकारचं नवं रुपडं म्हणजे 'योगा'. योगाचे अष्टांग योग, हट योग, विक्रम योग, अय्यंगार योग असे काही महत्त्वाचे प्रकार आहेत. पण बदलत्या काळात या प्रकारांना नवं रुपडं प्राप्त झालं आहे. पॉवर योगा, रोप योगा, ॲक्रोबॅट योगा असे नवे प्रकारही योगसाधनेत आले आहेत. सेलिब्रिटींनी मॉडर्न वर्क आउटसोबत योगाचं महत्त्व अधोरेखित केल्याने प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. प्रत्येक वयोगटाच्या व्यक्तीला योगाचे लाभ होत आहेत. गर्भावस्थेत योगा करणं अत्यंत फायदेशीर मानलं जातं. गर्भावस्थेत अवघडलेल्या स्नायूंना आराम मिळण्यासाठी योगासनांची मदत घेतली जाऊ शकते. पण यापूर्वी वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्या. योगाला प्राणायामची जोड दिल्यास डोकं शांत राहण्यास मदत होते. ध्यानामुळे मेंदुचे दोन्ही भाग कार्यान्वित होऊन आंतरिक क्रियांना बळ मिळतं. योगमुद्रा शारीरिक हालचालींमध्ये चपळता आणते. शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रिया योग्य पद्धतीने कार्यान्वित होते. प्राणायामामुळे हृदयाच्या कार्यपद्धतीत सुधारणा होते. त्यामुळे हृदयरोग किंवा हार्ट ॲटॅक येण्याची शक्यता कमी होते.



## सुडोकू ९८


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ४ | २ | | | | ७ | |
| | | | | ६ | | २ | | |
| | | | ९ | | ७ | | ८ | |
| | | ६ | १ | ७ | | | | ८ |
| २ | ८ | | | | | | १ | ७ |
| १ | | | | ८ | २ | ४ | | |
| | २ | | ७ | | ३ | | | |
| | | ५ | | २ | | | | |
| | ६ | | | | ९ | ८ | ३ | २ |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ९७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २ | ८ | ९ | २ | १ | ५ | ४ | ६ |
| १ | ६ | ४ | ८ | ७ | ५ | ३ | ९ | २ |
| ९ | २ | ५ | ४ | ६ | ३ | १ | ७ | ८ |
| २ | १ | ६ | ७ | ९ | ८ | ४ | ५ | ३ |
| ४ | ८ | ३ | ५ | १ | २ | ९ | ६ | ७ |
| ५ | ७ | ९ | ६ | ३ | ४ | २ | ८ | १ |
| ८ | ९ | २ | ३ | ४ | ६ | ७ | १ | ५ |
| ६ | ४ | १ | २ | ५ | ७ | ८ | ३ | ९ |
| ३ | ५ | ७ | १ | ८ | ९ | ६ | २ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ९८




**आडवे शब्द :-**
१) पत्नी
३) भूपती
५) आभारदर्शक शब्द
९) स्त्रियांचा एक दागिना
८) सावकार
११) धमकी
१२) नाखुषी, अतृप्ती
१३) दयाळू
१५) फटाक्याची माळ
१६) जंगली
१८) अवस्था,स्थिती
१९) सोने, धोत्रा
२१) रुग्णालय
२३) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
२४) उणीव,चणचण
२६) धमनी
२८) शाळेत विद्यार्थ्यांना बसण्याचे एक साधन
३०) शुष्क, ओलाच्या विरुद्ध
३२)असुर
३३) दर्पण
३४) पसंत नसलेला
३५) सकस
३७) अत्तराचा बोळा
३८) गवताचे पान
३९) कट्टा
४०)पदार्थाचा कमीत कमी भाग
४१) मध्यम प्रतीचा
४३) लोकांना जेऊ घालणे
४५) अटीतील दोन शब्द
४७) चंद्र
४८) अभिनेता
४९) गरज
५१) जनतेचे राज्य
५२) उदाहरणांसह
५४) अखंड कापडाचा गठ्ठा
५५) सावली
५६) शरम
५७) मातीचा कण
५८) धाडस करणे,धैर्य धरून पुढे येणे
६०) संगीतातील छोटा राग प्रकार
६३) चिरडणे,जोराने चोळणे,
६५) रेशमी धोतर
६७) मृत्यु नसलेला
६८) हमाल
७१) माराची खूण
७२) शीतलता
७३) बांबू
७५) चालू दिवस
७६) सरिता
७८) शोक करणे
७९) परतफेड
८१) परवानगीचा सरकारमान्य कागद
८४) पती,रमविणारा
८५) गणपतीला वाहण्याचे एक विशिष्ठ गवत प्रकार
८६) मोठा हातोडा
८७) चक्र

**उभे शब्द :-**
१) दूरचा नातेसंबंध
२) संगीतातील एक राग
३) एक नृत्य प्रकार
४) जावई (सं)
५) अत्यंत श्रीमंत माणूस
६) वाद्य वाजविणारा
७) करुणा
८) श्रीमंत
९)वाईट,अतृप्त इच्छा
१०) पोपट
१४) भांडण,चर्चा
१७) टीका करणारा
२०) नूतन,जुनाच्या विरुद्ध
२२) संसद सदस्य
२५) घागरा
२७) आच्छादन
२९) तंबूची भिंत
३१)मच्छर
३३) पक्ष बदलणारे
३६) लाकडी जिना
३८) बसण्याची फळी
३९) पर्ण
४०) हात
४२) जंगलातील रस्ता
४३) शर्त,पण
४४) वैरी, दावा लावणारा
४५) वस्तुची बनावट
४६) बारा वर्षाचा काळ
४८) सोंगे वठविणारा
४९) पुरुष
५०) वेळेचा कमीतकमी भाग
५३) उपस्थित
५४) ठाण्याचा रहिवासी
६१) स्वतःभोवती वेगाने फिरण्याची कृती
६२) महिना
६४) गाजावाजा
६६) औषध
६७) कुंतीचा धनुर्धारी पुत्र
६८) दूध न देणारी गाय
६९) समाचार
७०) वाळवी
७२) एक रंगीत कंदमूळ
७४) पाय
७५) तुम्ही,आम्ही सर्वजण
७७) नवऱ्याचा भाऊ
७९) फिकीर
८०) कलाक
८२) वाणी,बोलणे,जिव्हा
८३) श्वसनेंद्रिय

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# हैदराबादचा मुंबईवर विजय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

किती‍ही धावा केल्या तरी पुरणार नाहीत याचा प्रत्यय घडवत सनरायझर्स हैदराबादने वानखेडे मैदानावर अडीचशे पार धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला. मुंबईने २४३ धावांचा डोंगर उभारला तेव्हा तो पुरेसा ठरेल अशी चिन्हं होती मात्र हैदराबादच्या एकापेक्षा एक फटकेबाजांनी हे लक्ष्यही किरकोळ ठरवलं. हैदराबादने १८.४ षटकात ६ विकेट्स राखून संस्मरणीय विजय मिळवला.

डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांनी मुंबईच्या गोलंदाजीच्या ठिकऱ्या उडवल्या. मैदानाच्या कानाकोपऱ्यात चौकार-षटकार चोपून काढत हेड-अभिषेकने इरादे स्पष्ट केले. सातव्या ओव्हरमध्येच त्यांनी संघाचं शतक फलकावर नोंदवलं. जगातला नंबर एकचा गोलंदाज जसप्रीत बुमराहलाही या जोडीने सोडलं नाही. युवा अश्वनी कुमारच्या पहिल्याच ओव्हरमध्ये या दोघांनी २३ धावा कुटल्या. अफगाणिस्तानचा शिलेदार गनफझरने अभिषेक शर्माला बाद करत झंझावात रोखला. अभिषेकने २४ चेंडूत ४५ धावांची वेगवान खेळी केली. यात ४ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. दवामुळे दोनदा चेंडू गनफझरच्या हातातून निसटला. तिसऱ्या खेपेस इशान किशन त्रिफळाचीत होऊन तंबूत परतला. त्याला भोपळाही फोडता आला नाही. हेनरिच क्लासनने गनफझरची हॅट्ट्रिक होऊ दिली नाही.



हार्दिक पंड्याने हेडला बाद करत हैदराबादला वेसण घातली. हेडने ३० चेंडूत ४ चौकार आणि ८ षटकारांसह ७६ धावांची वादळी खेळी केली. ऑफस्टंपबाहेरच्या चेंडूवर मोठा फटका मारायचा हेडचा प्रयत्न विल जॅक्सच्या हातात जाऊन विसावला. क्लासन-नितीश जोडीने अश्वनीच्या दुसऱ्या ओव्हरमध्ये १८ धावा लुटल्या. जसप्रीत बुमराहच्या षटकात १३ धावा लुटत हैदराबादने चमत्कार घडवण्यासाठी सज्ज असल्याचं दाखवून दिलं. हेड आणि अभिषेकने दिलेल्या पायावर हेनरिच क्लासनने कळस चढवला. सातत्याने चौकार वसूल करत क्लासनने मुंबईच्या आक्रमणातली हवा काढून टाकली. क्लासन-नितीश जोडीने ४० चेंडूत ८० धावांची वादळी भागीदारी केली. क्लासनने ३० चेंडूत ६५ धावांची तडाखेबंद खेळी केली. या खेळीत ७ चौकार आणि ४ षटकारांची लयलूट केली. नितीश बाद झाल्यानंतर सलील अरोराने क्लासनला चांगली साथ दिली. सलीलने १० चेंडूत ३० धावांची उपयुक्त खेळी केली.

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याने प्रथम फलंदाजीचा धाडसी निर्णय घेतला. वानखेडेचं मैदान छोटं आहे. दुसऱ्या डावात धावांचा पाठलाग होतो. दव पडलं तर गोलंदाजी करणं कठीण होतं. यामुळे टॉस जिंकून कर्णधार गोलंदाजी स्वीकारतात. पण हार्दिकने परंपरेला छेद देत फलंदाजीचा करणार असल्याचं सांगितलं. मांडीच्या स्नायूंना झालेल्या दुखापतीतून अजूनही पूर्णपणे न सावरल्याने हिटमॅन रोहित शर्मा या सामन्यातही खेळणार नसल्याचं स्पष्ट झालं. अनुभवी विकेटकीपर बॅट्समन क्विंटन डी कॉक मनगटाला झालेल्या दुखापतीमुळे खेळू शकला नाही. मुंबईने या दोघांऐवजी रायन रिकलटन आणि रॉबिन मिन्झ यांना संधी दिली.

रिकलटनच्या बरोबरीने विल जॅक्स सलामीला आला. या जोडीने ७.१ ओव्हर्समध्ये ९३ धावांची खणखणीत सलामी दिली. हैदराबादच्या प्रत्येक गोलंदाजांचा समाचार घेत रिकलटन-हेड जोडीने फटकेबाजी केली. रिकलटनने लेगसाईडवर लक्ष केंद्रित करत चौकार-षटकारांची लयलूट केली. नितीश कुमार रेड्डीने जॅक्सचा अडथळा दूर केला. त्याने २२ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह ४६ धावांची खेळी केली. भारतीय टी संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याही सामन्यात मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. इशान मलिंगाने त्याला बाद केलं. तो ५ धावाच करू शकला. नमन धीरने १७ चेंडूत २२ धावांची खेळी करत रिकलटनला चांगली साथ दिली. प्रफुल्ल हिंगने नमनची खेळी संपुष्टात आणली. स्पर्धेत धावांसाठी झगडणाऱ्या हार्दिकने १५ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ३१ धावांची खेळी केली. एका बाजूने सहकारी बाद होत असतानाही रिकलटनची एकाग्रता भंगली नाही. प्रचंड उकाडा आणि आर्द्रता अशा वातावरणात संपूर्ण २० ओव्हर्स बॅटिंग करत रिकलटनने १० चौकार आणि ८ षटकारांसह नाबाद १२३ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. मुंबई इंडियन्सतर्फे ही सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. रिकलटनने अवघ्या ४४ चेंडूत शतक पूर्ण केलं. मुंबई संघासाठी हे सगळ्यात वेगवान शतक आहे. मुंबईने २४३ धावांचा डोंगर उभारला. हैदराबादतर्फे हिंगेने २ विकेट्स पटकावल्या.

मुंबई इंडियन्स आता सनरायझर्स हैदराबादनंतर आयपीएलमधील असा दुसरा संघ ठरला आहे, ज्याच्या तीन किंवा अधिक वेगवेगळ्या फलंदाजांनी एकाच हंगामात शतकं झळकावली आहेत. यापूर्वी २०२५ च्या आयपीएल हंगामात, सनरायझर्स हैदराबादसाठी अभिषेक शर्मा, इशान किशन आणि हेनरिक क्लासेन यांनी शतकं झळकावली होती. तर, रिकल्टनच्या आधी, या हंगामात मुंबई इंडियन्सकडून डी कॉक आणि तिलक वर्मा यांनी शतकं झळकावली होती.




# अर्जुन तेंडुलकवर लागणार बोली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२६ मध्ये लखनौ सुपरजायंट्स संघाचा भाग असलेल्या अर्जुन तेंडुलकरला आतापर्यंत खेळण्याची संधी मिळालेली नाही. पण लखनौ संघाच्या निराशाजनक कामगिरीनंतर अर्जुनला संघाकडून खेळण्याची संधी मिळण्याची शक्यता वाढली आहे.



असं असताना अर्जुन तेंडुलकरने दुसऱ्या लीगमध्ये खेळण्यासाठी लिलावाकरिता आपले नाव नोंदवले आहे.

मुंबई टी २० लीगसाठी लिलाव प्रक्रिया २ मे रोजी होणार आहे. अर्जुन देखील ५ लाख रुपयांच्या मूळ किमतीसह या लिलावात दिसणार आहे. वास्तविक, अर्जुन तेंडुलकर गोव्याकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो, पण असे असूनही त्याला मुंबई टी २० लीगमध्ये खेळण्याची परवानगी देण्यात आली आहे.

अर्जुन तेंडुलकर सध्या गोवा रणजी संघाकडून खेळत आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या नियमांनुसार, संघात परतणाऱ्या कोणत्याही मुंबईस्थित खेळाडूला एक वर्षाचा कूलिंग-ऑफ कालावधी पूर्ण करावा लागतो. परंतु एमसीए सचिव उन्मेश खानविलकर यांनी सांगितले की, हा नियम अर्जुन तेंडुलकरला लागू होत नाही, कारण त्याने कोणत्याही गोवा टी २० लीगमध्ये भाग घेतलेला नाही.

भारताचा टी २० कर्णधार सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर आणि शिवम दुबे हे देखील टी २० मुंबई लीगमध्ये खेळणार आहेत. या तिन्ही खेळाडूंना त्यांच्या संबंधित संघांनी कायम ठेवले आहे. यशस्वी जयस्वाललाही बांद्रा ब्लास्टर्सने घेतलं आहे. परंतु अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी कसोटी सामन्यामुळे त्याच्या लीगमध्ये सहभागी होण्याची शक्यता कमी आहे.

आयपीएल २०२६ च्या आधी लखनौ सुपरजायंट्सने त्याला ट्रेडिंगद्वारे ३० लाख रुपयांच्या मूळ किमतीत विकत घेतले होते. मात्र, त्याला अद्याप संधी मिळालेली नाही. लखनौ सुपरजायंट्सचे व्यवस्थापन त्याला कधी मैदानात उतरवेल हे पाहणे बाकी आहे.

# वैभव सूर्यवंशीमुळे पोलार्डचा वर्ल्ड रेकॉर्ड धोक्यात

**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

वैभव सूर्यवंशी सलग दुसऱ्या आयपीएल हंगामामध्ये त्याच्या स्फोटक फलंदाजीने गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले आहे. प्रत्येक सामन्यात तो धमाकेदार फलंदाजी करत आहे. त्याने त्याच्या फलंदाजी शैलीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. क्रिकेटविश्वात त्याच्या फलंदाजीचे कौतुक होत असून जेव्हा-जेव्हा तो मैदानावर येतो तेव्हा-तेव्हा तो अनेक विक्रम मोडतो किंवा रचतो. त्याच्या वादळी फलंदाजीने अनेक दिग्गजांचे विक्रम मोडले गेले आहेत. आता तो आणखी एक विश्वविक्रम मोडण्याच्या तयारीत आहे.

वैभव खेळपट्टीवर येताच मोठ-मोठे शॉट्स खेळतो. तो पहिल्या चेंडूपासूनच त्याची सुरूवात करतो. त्याने आतापर्यंत आयपीएल २०२६ मध्ये ४०० धावांचा टप्पा गाठला आहे. यामधील ३५० पेक्षा अधिक धावा तर त्याने केवळ चौकार-षटकारांनीच केल्या आहेत. सुरू असलेल्या हंगामात त्याने आतापर्यंत ३४ चौकार आणि ३७ षटकार मारले आहेत. तसेच त्याने ४२ धावा एकेरी धाव घेत केल्या आहेत. आता त्याने केवळ एक षटकार मारला की कायरन पोलार्डचा विश्वविक्रम मोडला जाईल.

वैभवने टी २० च्या २७ डावांमध्ये ११०१ धावा केल्या असून त्यामध्ये ४ शतके आणि ३ अर्धशतकांचा समावेश आहे. तसेच यामध्ये त्याने ९९ षटकार मारले आहेत, यामुळे त्याला षटकारांचे शतक करण्यासाठी केवळ एका षटकाराची आवश्यकता आहे. टी २० क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०० षटकार मारण्याचा विक्रम पोलार्डच्या नावावर आहे. हाच विक्रम वैभव मोडण्याच्या तयारीत आहे.

टी २० मध्ये पोलार्डने ८४३ चेंडूंमध्ये १०० षटकार मारण्याचा विक्रम केला आहे. दुसरीकडे वैभवने केवळ ५११ चेंडूतच ९९ षटकार मारले आहेत. यामुळे त्याच्याकडे ३०० पेक्षा अधिक चेंडू शिल्लक असून केवळ एका षटकाराची आवश्यकता आहे. यामुळे पोलार्डचा हा विक्रम लवकरच मोडला जाणार हे निश्चित आहे.वैभवचा हा दुसरा आयपीएल हंगाम आहे. त्याने आतापर्यंत १६ सामने खेळताना ६५२ धावा केल्या आहेत. यामध्ये दोन शतके आणि ३ अर्धशतकांचा समावेश आहे.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)